| 0390 | 1184 | 2237 | 3014 | 3741 | 4774 | 5555 | 6263 | 7017 | 7918 | 8819 | 9661 |
| 0395 | 1231 | 2244 | 3015 | 3840 | 4831 | 5575 | 6301 | 7040 | 7941 | 8820 | 9808 |
| 0465 | 1257 | 2250 | 3033 | 3877 | 4844 | 5585 | 6350 | 7055 | 7994 | 8830 | 9855 |
| 0513 | 1277 | 2255 | 3126 | 3899 | 4853 | 5596 | 6353 | 7061 | 8004 | 8853 | 9900 |
| 0520 | 1302 | 2270 | 3144 | 4090 | 4891 | 5597 | 6384 | 7173 | 8058 | 8866 | 9907 |
| 0586 | 1346 | 2280 | 3159 | 4230 | 4928 | 5613 | 6468 | 7177 | 8062 | 8876 | 9926 |
| 0603 | 1372 | 2281 | 3198 | 4240 | 4954 | 5635 | 6604 | 7287 | 8110 | 8986 | 9937 |
| 0680 | 1379 | 2321 | 3265 | 4361 | 4966 | 5653 | 6624 | 7397 | 8212 | 9089 | 9944 |
| 0703 | 1495 | 2324 | 3334 | 4374 | 4991 | 5657 | 6649 | 7417 | 8318 | 9092 | 9973 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# संविधानाचे अधिष्ठान देणारे बाबासाहेब

**भारतासारख्या** प्राचीन परंपरा असलेल्या राष्ट्राला अनेक परकीय आक्रमणांनी नेस्तनाबूत करण्याचा प्रयत्न केला. परंतु भारतीयत्व आणि मानवाच्या इतिहासातील जीवनमूल्यांमुळे हे राष्ट्र टिकून राहिले. ब्रिटिशांची प्रदीर्घ परकीय सत्तासुद्धा याच गुणवैशिष्ट्यांमुळे उलथवता आली. भारतीयता आणि मानवता या दोन्ही प्रमुख मूल्यांवर स्वातंत्र्य प्राप्त करता आले आणि स्वातंत्र्यानंतरची या देशाची वाटचाल याच मूल्यावर टिकवून ठेवण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानातून होऊ शकली. आज बाबासाहेब आंबेडकरांचा महापरिनिर्वाण दिन आणि भारतीय संविधानाचे अमृतमहोत्सवी वर्ष. या दोन्ही घटनांविषयी भारतीयांच्या श्रद्धा आणि निष्ठा एकत्रितपणे व्यक्त होत आहेत. संविधानाने भारतीयता टिकवून ठेवण्यासाठी केलेल्या तरतुदी आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता या त्रिसूत्रीवर मानवतेचे संवर्धन करण्याबरोबरच संविधानालादेखील तात्त्विक अधिष्ठान डॉ. बाबासाहेबांच्यामुळे बहाल होऊ शकले. भारतीयता अक्षुण्ण ठेवायची असेल तर मानवतेचे मूल्य सर्वाधिक महत्त्वाचे ठरते. आणि मानवता टिकवायची असेल तर समता, बंधुता, स्वातंत्र्य या तीन उद्दिष्टांशिवाय त्याला परिपूर्णता येऊ शकत नाही. याच मुद्यांचा बाबासाहेबांनी घटना समितीच्या जवळपास प्रत्येक बैठकीमध्ये वारंवार उल्लेख केल्याचे पाहायला मिळते. भारतभूमीला लाभलेले बाबासाहेबांसारखे महापुरुष म्हणजे या देशाच्या महानतेचा सर्वात मोठा गौरव ठरतो. बाबासाहेबांच्या महानतेमुळेच जगातले महान असे संविधान भारताला प्राप्त होऊ शकले. आज सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातले अभ्यासक भारताच्या संविधानाचा अभ्यास तर करतातच. शिवाय बाबासाहेबांच्या जीवनचरित्राचे सखोल चिंतनही करतात. ज्या संविधानाची उभारणी ही समता, बंधुता आणि स्वातंत्र्यावर झालेली आहे या तिन्ही गोष्टींपासून भारतातला बराच मोठा समाज शेकडो वर्षे वंचित होता. ज्याला समता अनुभवू दिली नाही. परिणामी बंधुता लक्षात येऊ शकली नाही. आणि या दोन्ही गोष्टी नसल्याने या सर्वात मोठ्या वर्गाला स्वातंत्र्य उपभोगता आले नाही. माणुसकीलाच हद्दपार करणाऱ्या गोष्टी बाबासाहेबांनी प्रत्यक्ष अनुभवल्या होत्या.

### भारतीयांना सांगितलेल्या तीन गोष्टी

घटना समितीतल्या आपल्या शेवटच्या भाषणातही त्यांनी भारतीय लोकशाहीचे संरक्षण करण्याकरीता तीन महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या होत्या. त्यातली पहिली गोष्ट म्हणजे भारतीयांनी आपले सामाजिक आणि आर्थिक हेतू साध्य करताना घटनात्मक मार्गांचाच अवलंब करावा. घटनाबाह्य मार्ग म्हणजे अराजकाचे व्याकरण अशा शब्दांत त्यांनी वर्णन केले होते. दुसरा मुद्दा सांगताना त्यांनी भारताचे स्वातंत्र्य टिकवताना विभूतीपूजा टाळली पाहिजे. एखादा माणूस कितीही मोठा असला तरी त्याच्या चरणावर त्यांनी आपले स्वातंत्र्य अर्पण करू नये. लोकशाहीच्या संरक्षणासाठी तिसरी गोष्ट सांगताना बाबासाहेबांनी राजकीय लोकशाहीचे सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीत रूपांतर झाले पाहिजे. कारण सामाजिक लोकशाही स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या तीन तत्त्वांचे संवर्धन करते. याचे विश्लेषण करताना त्यांनी म्हटले होते की, सामाजिक समता नसेल तर स्वातंत्र्याचा अर्थ मूठभर लोकांनी राज्य करण्यासारखा होईल. समता ही जर स्वातंत्र्यशून्य असेल तर लोकांच्या स्वयंप्रेरणांना मर्यादा पडतील. आणि जर बंधुभाव नसेल तर स्वातंत्र्य आणि समता यांना मर्यादा पडतील. याचा अर्थ बाबासाहेबांना सामाजिक आणि राजकीय समानतेबरोबर आर्थिक समता तितकीच महत्त्वपूर्ण वाटत होती. प्रदीर्घकाळच्या अभ्यासातून त्यांनी भारतीय समाजव्यवस्थेचे विश्लेषण केले होते. अस्पृश्यतेविरुद्धचा लढा आणि आपली मायभूमी भारताच्या एकतेसाठी त्यांनी केलेले सर्व प्रयत्न त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण महानतेचे द्योतक ठरतात. म्हणूनच संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षातला त्यांचा हा महापरिनिर्वाण दिन त्यांनी भारताला अमरत्व देणाऱ्या तेजःपुंज सूर्याचे स्मरण ठरते. केवळ लोकशाहीवादी राष्ट्र होऊन काही घडू शकले नसते. स्वतःला प्रजासत्ताक म्हणवून घेताना त्यामध्ये खऱ्या अर्थाने राष्ट्रतेजाचाही प्राण फुंकला हे सर्व भारतीयांनी कायमचे लक्षात ठेवण्याची आवश्यकता आहे. आज संविधानाच्यानिमित्ताने राजकीय आरोप-प्रत्यारोप होत असतात. परंतु संविधान कोणत्याही राजकीय उद्दिष्टांचे साधनही होऊ शकत नाही आणि माध्यमही ठरू शकत नाही. ते राष्ट्रीय एकतेच्या आणि सामाजिक समतेच्या चौकटीबाहेर कोणताही विचार करीत नाही. संविधान समजून घ्यायचे असेल तर प्रथम बाबासाहेबांचे जीवन आणि कार्य समजून घ्यावे लागेल. कारण एवढे मोठे संविधान देऊनही बाबासाहेबांना राजकीयदृष्ट्या त्रास देण्याचेही काम झाले.

### ज्ञानकोषासारखी विद्वत्ता

या अखेरच्या घटना समितीच्या बैठकीत बाबासाहेबांनी ज्यांना सहकार्य केले. त्या सर बी. एन. राव, आलादी कृष्णस्वामी अय्यर, एस. एन. मुखर्जी, पंडित ठाकूरदास आदि अनेकांचे आभार मानले होते. एकूणच भारताच्या इतिहासात आपल्या कार्याविषयीचा दृढविश्वास आणि एक विशिष्ट ध्यास घेऊन काम करणारे आगळेवेगळे व्यक्तिमत्त्व म्हणून बाबासाहेबांचेच ठळकपणे स्मरण होते. त्यांच्याविषयी अनेक ठिकाणी असे म्हटले गेले आहे की, त्यांच्या ग्रंथलिखाणामधून सुवासिक साधेपणा लिखाणाची पाणीदार शैली आणि एखाद्या न्यायाधीशाला शोभेल अशी तर्कप्रधान मांडणी असायची. त्यांचे ज्ञान प्रचंड तर होतेच. कारण ते ज्ञानाच्याबाबतीत सर्व संग्राहक होते. सखोल चिंतन तर त्यांचे विचार काहीवेळला प्रक्षोभक आणि बोधकारक होते. म्हणूनच त्यांची विद्वत्ता ज्ञानकोषासारखी मानली गेली होती. त्यांनी लिहिलेले ग्रंथ हे अनेक गहन प्रश्नांवरचे किंवा समस्यांवर उत्तर सांगणारे आहेत. नावलौकिकासाठी त्यांनी कुठलेच लिखाण केले नाही. म्हणूनच त्यांच्याबाबतीत असेही म्हटले गेले की, त्यांनी आपली लेखणी कलावंत म्हणून नव्हे तर महान विचारवंत म्हणून वापरलेली पाहायला मिळते. बाबासाहेबांमधला हा सगळा गुणसमुच्चय त्यांच्यातील दूरदृष्टी आणि विवेकसंपन्नता दर्शवणारा ठरतो. त्यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांच्याविषयी व्यक्त होणारा आदर त्यांच्यातील काही गुणांच्या अनुकरणातून ठळकपणाने लक्षात येऊ शकतो. अशा या त्रिकालदर्शी महापुरुषाला विनम्र अभिवादन.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

तुम्ही चांगले आहात की वाईट हा कधीच विचार करू नका. कारण गरज पडली की तुम्ही चांगले आणि गरज संपली की वाईट.

## पंचांग

**शनिवार, ६ डिसेंबर २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**
**मार्गशीर्ष कृष्ण द्वितीया**
**नक्षत्र : मृग/आर्द्रा**

**रवी उदय- ०७-००**
**रवी अस्त- १८-००**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० मिथुन**

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन; क्रांतिसिंह नाना पाटील स्मृतिदिन**

## पाककृती

### तीळ गजक



★ **साहित्य :-** १ कप पांढरे तीळ, १ कप गूळ, १ चमचा शुद्ध तूप, अर्धा चमचा वेलची पूड, २ टेबलस्पून पाणी.

★ **कृती :-** सर्वात आधी तीळ मंद आचेवर भाजून घ्या आणि बाजूला ठेवा. आता एका पॅनमध्ये तूप गरम करा. नंतर गूळ आणि थोडे पाणी घाला आणि शिजवा. पाक तयार झाल्यानंतर भाजलेले तीळ आणि वेलची पूड घाला. दोन्ही साहित्य चांगले मिसळा. आता हे मिश्रण ग्रीस केलेल्या प्लेटवर पसरवा. हवे असल्यास, ते लाटण्याने हलके लाटून घ्या आणि हव्या त्या आकारात कापून घ्या. थंड झाल्यावर, तुमचा कुरकुरीत, स्वादिष्ट आणि पौष्टीक गजक तयार आहे.

**टीप:** तीळ जास्त भाजू नका. तीळ हलके सोनेरी होईपर्यंत भाजून घ्या. जास्त भाजल्याने कडू चव आणि खराब रंग येऊ शकतो. तसेच गुळाचा पाक योग्यरित्या तयार करा. कमी किंवा मध्यम आचेवर गूळ नेहमी वितळवा.

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.) संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०, जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९, छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)



# भारत आणि द. आफ्रिकेत आज तिसरा सामना
# विजयासह मालिका जिंकण्याचे आव्हान

■ विशाखापट्टणम

**तीन एकदिवसीय मालिकेतील भारत आणि दक्षिण आफ्रिकेने १-१ ने बरोबरीच्या स्थितीत आहे. त्यामुळे उद्या विशाखापट्टणममध्ये होणार्या तिसर्या आणि शेवटच्या एकदिवसीय सामन्यात दोन्ही संघ विजयासह मालिका जिंकण्यासाठी सज्ज झाले आहेत. करो या मरोची स्थिती असल्यामुळे संघांतील खेळाडूंनी मैदानावर कसून सराव केला. या सामन्यात दोन्ही संघ सर्वोत्तम प्लेइंग इलेव्हन मैदानात उतरवण्याचा प्रयत्न करतील.**



**सलामीचा** डावखुरा फलंदाज यशस्वी जैस्वाल हा पहिल्या दोन सामन्यांमध्ये मोठी खेळी करण्यात सपशेल अपयशी ठरला. तरीही कर्णधार के. एल. राहुल आणि संघ व्यवस्थापन त्याच्यावर आणखी एकदा विश्वास दाखवण्याची शक्यता आहे. तो कर्णधार रोहित शर्मा सोबत डावाची पुन्हा सुरुवात करताना दिसण्याची शक्यता आहे. रोहितने पहिल्या सामन्यात ५७ धावांची अर्धशतकी खेळी केली होती. तिसऱ्या क्रमांकावर 'रन मशीन' विराट कोहली उतरणार हे निश्चित आहे, ज्याने गेल्या दोन एकदिवसीय सामन्यांमध्ये सलग दोन शतके झळकावली आहेत. चौथ्या क्रमांकावर युवा सलामीवीर ऋतुराज गायकवाडला संधी मिळण्याची दाट शक्यता आहे. दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात त्याने धमाकेदार शतक (१०५ धावा) ठोकत भारतीय संघाला ३५८ धावांपर्यंत पोहोचवण्यात मोलाची भूमिका बजावली होती. पाचव्या क्रमांकावर कर्णधार के. एल. राहुल स्वतः खेळणार असून तो यष्टीरक्षणाचीही जबाबदारी सांभाळेल. अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजा याला संघात पुन्हा एक संधी मिळू शकते. गेल्या दोन्ही सामन्यांमध्ये वेगवान गोलंदाज प्रसिद्ध कृष्णाला म्हणावी तशी कामगिरी करता आलेली नाही. दोन सामन्यांत त्याला केवळ तीन विकेट घेता आल्या आहेत. त्याचप्रमाणे अष्टपैलू वॉशिंग्टन सुंदर देखील प्रभावी खेळ दाखवण्यात अपयशी ठरला होता. त्यामुळे या दोन खेळाडूंच्या अंतिम ११ मधील स्थानावर मोठी टांगती तलवार

## समरदीपला सुवर्णपदक

**जयपूर-** समरदीप सिंग गिलने गुरूवारी येथे झालेल्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्समध्ये पुरूषांच्या गोळाफेकमध्ये ऑल इंडिया युनिव्हर्सिटीच्या स्वताचाच विक्रम मागे टाकला तर ईशा चंदर प्रकाश (महिला हेप्टाथ्लॉन) आणि पुरूषांच्या ४ बाय १०० मी. रिले संघाने नवा विक्रम नोंदवले. यावर्षी दोनवेळचा आशियाई गेम्स चॅम्पियन तजिंदरपाल सिंग तूरला समरदीपने सुवर्णपदक जिंकण्याच्या दुसऱ्या प्रयत्नात १९.४२ मी. अंतरापर्यंत शॉटपुट फेकले.

## शाई होपने नाबाद शतकासह न्यूझीलंडचा विजय लांबवला

■ क्राइस्टचर्च

**क्राइस्टचर्चमध्ये** सुरू असलेल्या मालिकेतील पहिल्या कसोटीच्या चौथ्या दिवशी आज पराभवाच्या छायेत असलेल्या वेस्ट इंडिजने शाई होपच्या नाबाद शतकी खेळीच्या जोरावर न्यूझीलंडचा विजय लांबवला. न्यूझीलंड संघाने ८ बाद ४६६ धावांवर दुसरा डाव घोषित केला. परिणामी वेस्ट इंडिजला विजयासाठी ५३१ धावांचे आव्हान मिळाले. आज दिवसअखेर वेस्ट इंडिजने ४ गडी गमावून २१२ धावा केल्या. न्यूझीलंडला या कसोटीत विजय मिळवायचा असेल तर पाचव्या दिवशी ६ विकेट घेणे गरजेचे आहे.

विजयी धावांचा पाठलाग करण्यासाठी जॉन कॅम्पेल आणि



टॅगनरीन चंद्रपॉल ही जोडी मैदानात उतरली होती. मात्र २४ धावा असताना पहिला धक्का बसला. जॉन कॅम्पेल १५ धावा करून बाद झाला. त्यानंतर टॅगनरीन चंद्रपॉल ६ धावांवर असताना विकेट पडली. त्यामुळे वेस्ट इंडिजची २५ धावांवर दुसरी विकेट पडली. त्यानंतर एलिक एथान्झे ५ धावा करून तंबूत परतला. तर रोस्टन चेसही फार काही करू शकला नाही. तो देखील ४ धावा करून बाद झाला. पण शाई होप आणि जस्टीन ग्रीव्हस यांनी डाव सावरला.

**खो-खो स्पर्धा!**

## शिर्सेकर महात्मा गांधी अकॅडमी आणि ज्ञानविकास फाऊंडेशनने विजेतपद पटकावले

■ ठाणे

**दी** युनायटेड स्पोर्ट्स क्लब ठाणे यांच्या आयोजनाखाली श्री दत्तजयंती उत्सवनिमित्त सुरू झालेल्या जे. पी. कोळी निमंत्रित विभागीय पुरुष व महिला खो-खो स्पर्धेत महिलांमध्ये कोपरखैराणेच्या ज्ञानविकास फाऊंडेशनने तर पुरुषांमध्ये वांद्र्याच्या शिर्सेकर महात्मा गांधी स्पो. अकॅडमीने विजेतपद मिळवत विभागीय चषकावर नाव कोरले.

महिलांच्या अंतिम सामन्यात ज्ञानविकासने रा. फ. नाईकचा ११-९ (मध्यंतर ६-४) असा २ गुणांनी विजय साजरा केला. या सामन्यात ज्ञानविकासने मध्यंतराला घेतलेली २ गुणांची आघाडीच त्यांना विजेतेपद देऊन गेली.

ज्ञानविकासच्या दिव्या गायकवाड (२, ३.४० मि. संरक्षण व २ गुण), श्रावणी घाडगे (नाबाद १.४०, २ मि. संरक्षण), कल्याणी कंक (२.२० मि. संरक्षण व १ गुण), पायल भगणे (३ मि. संरक्षण व ५ गुण), श्रावणी मोरे (२.१० मि. संरक्षण) व प्रांजल पोर्टे (२ गुण) यांनी विजयाची पायाभरणी करत प्रतिस्पर्धी रा. फ. नाईकला शेवटपर्यंत डोके वर काढूच दिले नाही. तर पराभूत रा. फ. नाईकच्या साक्षी तोरणे, सिद्धी नागिमे, शितल थोर, गौरी रोडे यांनी जोरदार व दिलेली कडवी लढत अपयशी ठरली. पुरुषांच्या अंतिम सामन्यात वांद्र्याच्या शिर्सेकर महात्मा गांधी स्पो. अकॅडमीने कोपरखैराणेच्या ग्रिफिन जिमखान्याचा १५-१३ (मध्यंतर ८-६) असा २ गुणांनी पराभव केला. शिर्सेकर महात्मा गांधीच्या हर्षद हातनकर (२.२०, २.१० मि. संरक्षण व २ गुण), अर्पित तिवारी (१, २ मि. संरक्षण व २ गुण), ओमकार सोनावडे (२.१०, १.५० मि. संरक्षण व २ गुण), प्रतिक देवरे (२, १ मि. संरक्षण), ऋषिकेश मुर्चावडे (१, १.१० मि. संरक्षण व १ गुण), अनिकेत पोटे व अर्जुन अनिवसे (प्रत्येकी ४ गुण) यांनी विजयात मोठा वाटा उचलला.

## दीपिका, जियांश, स्पृहाचे नवीन विक्रम



■ ठाणे

**शिवछत्रपती** पुरस्कार विजेते दत्ता चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करणाऱ्या ट्रॅक अँड फिल्डच्या दीपिका सखदेव, जियांश पाटील आणि स्पृहा नाडकर्णीने ४८ व्या वायएमसीए खुल्या राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेत नवीन स्पर्धा विक्रमांसह आपापल्या वयोगटात वैयक्तिक अजिंक्यपदांना गवसणी घातली आहे.

१४ वर्षे वयोगटाच्या ६० मीटर अंतराच्या शर्यतीत सुवर्ण पदक जिंकणाऱ्या दीपिकाने या गटात आपला दबदबा निर्माण करताना लांब उडीतील १० वर्षे जुना विक्रम मोडीत काढला. दीपिकाने ५.१९ मीटर लांब झेप घेत ५.१८ मीटरचा विक्रम मागे टाकला. जियांशने १० वर्षे गटातील लांब उडीत ४.६४ मीटर अशी कामगिरी साधत २०१० साली नोंदवलेला ४.४४ मीटर अंतराचा विक्रम पुसून टाकला. याच वयोगटातील मुलींच्या स्पर्धेत स्पृहा नाडकर्णीने ४.०५ मीटर अशा नवीन उच्चांकासह ३.९९ मीटरचा विक्रम मोडला. याशिवाय रुदित्य कविश्वरने ८ वर्षे वयोगटात आपला वरचष्मा ठेवला. या सर्व विजेत्यांची स्वप्निल चव्हाण आणि देसाई मॅडम यांनी स्पर्धेसाठी विशेष तयारी करवून घेतली होती.

## ऑस्ट्रेलियाचे चोख प्रत्युत्तर इंग्लंडवर ४४ धावांची आघाडी

**ब्रिस्बेन-** अ‍ॅशेस कसोटी मालिकेतील दुसऱ्या सामन्याच्या दुसऱ्या दिवशी आज ऑस्ट्रेलियन फलंदाजांनी पहिल्या डावात इंग्लंडला चोख प्रत्युत्तर देत ४४ धावांची आघाडी घेतली. इंग्लंडचा पहिला डाव ३३४ धावांवर आटोपला. त्यानंतर दिवसअखेर ऑस्ट्रेलियाने ६ बाद ३७८ धावा केल्या. अ‍ॅलेक्स कॅरी आणि मायकेल नेसर हे अनुक्रमे ४६ आणि १५ धावांवर नाबाद तंबूत परतले. ट्रॅव्हिस हेडने ३३, जेक वेदरल्डने ७२, मार्नस लाबुशेनने ६५, स्टीव्हन स्मिथने ६१, कॅमेरॉन ग्रीनने ४५ धावा केल्या.

## धाराशिव, सोलापूर, ठाणे, पुणे, रत्नागिरीची आगेकूच

■ अहिल्यानगर

**बुन्हाणनगर** येथील श्री बाणेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयमध्ये सुरू झालेल्या ५१ वी मुले-मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी प्रेक्षकांनी रोमहर्षक क्षणांचा मनसोक्त आनंद घेतला. मुलींच्या गटात धाराशिव, सोलापूर, ठाणे, सांगली, पुणे आणि रत्नागिरी यांनी प्रभावी कामगिरी केली, तर मुलांच्या गटात धाराशिव, सोलापूर, अहिल्यानगर, ठाणे, सातारा, नाशिक आणि पुणे संघांनी दमदार विजय मिळवत स्पर्धेत जोरदार मुसंडी मारली.

सकाळच्या पहिल्या सामन्यात धाराशिवच्या मुलींनी रायगडवर १ डाव ३२ गुणांनी (४४-१२) दणदणीत विजय मिळवला. संघातील मैथिली पवारने ४.२० मिनिटे पळती खेळ करत तब्बल १० गुणांची कमाई करून सामन्याची शान वाढवली. राही पाटील (२.१० मि. संरक्षण व २ गुण), मुग्धा वीर (३.१० मि. संरक्षण व २ गुण), श्रावणी गुंड (३.२० मि. संरक्षण व २ गुण) यांनीही भक्कम खेळ सादर केला.



दुसऱ्या सामन्यात सोलापूरने धुळेचा १ डाव १९ गुणांनी (३३-१४) पराभव केला. अश्विनी मांडवे (३ मि. संरक्षण व ४ गुण) आणि कल्याणी लामकाणे (३.०१ मि. संरक्षण व ४ गुण) यांनी चमकदार कामगिरी केली. धुळ्यातर्फे हर्षदा कोळी (६ गुण) हिने संघाचा मान राखला. ठाणे संघाने चुरशीच्या लढतीत मुंबईचा १ डाव १३ गुणांनी (२९-१६) पराभव केला. प्राची वांगडे (३ मि. संरक्षण व ४ गुण), वैष्णवी जाधव (नाबाद २.२० मि. संरक्षण व ४ गुण) यांनी विजयात सिंहाचा वाटा उचलला.

# जेम्स बॉण्डचा जनक इयान फ्लेमिंग

**जगातील गुप्तहेरांचा विषय आला म्हणजे सगळ्यात पहिले आठवतो तो म्हणजे एमआय ६ या गुप्तहेर संघटनेचा जगभरात गाजलेला गुप्तहेर जेम्स बॉण्ड. भारदस्त व्यक्तिमत्व, बलदंड शरीरयष्टी, कधीही हार न मानण्याची वृत्ती, नेहमीच वेगवेगळ्या क्लृप्त्या लढवून विजयश्री खेचून आणणारा जेम्स बॉण्ड म्हणजे एक काल्पनिक पात्र आहे यावर कोणाचाच विश्वास बसत नाही. जेम्स बॉण्डचा जन्म १९५२ ला कॅसिनो रॉयल या कादंबरीत झाला. ही कादंबरी लिहिली होती ब्रिटिश लेखक इयान फ्लेमिंग यांनी. ही कादंबरी लोकप्रिय होण्यासोबतच सर्वाधिक खपाची झाली. त्यामुळे यानंतर १९६३ ते १९६६ या कालावधीत फ्लेमिंग यांनी आपला मानसपूत्र बॉण्डवर ११ कादंबऱ्या आणि दोन लघुकथा लिहिल्यात. ००७ या आपल्या कोडनेमने प्रसिध्द असलेला गुप्तहेर जेम्स बॉण्ड हा एमआय ६ या संघटनेचा एजंट आणि रॉयल नेव्हीतील रिझर्व्ह कमांडर.**

आजवर काल्पनिक पात्रांवर बेतलेल्या कादंबऱ्यांमध्ये सर्वाधिक खपाचा मान जेम्स बॉण्डच्या कादंबऱ्यांना जातो. जगभरात आजवर या कादंबऱ्यांच्या १० करोडपेक्षा जास्त प्रती विकल्या गेल्या आहेत. पण आश्चर्यकारक गोष्ट अशी की, फ्लेमिंग यांच्या मृत्यूनंतरही या जेम्स बॉण्डची लोकप्रियता तसूभरही कमी झालेली नाही. आज ५४ वर्षांनंतरही जेम्स बॉण्डला केंद्रित ठेवून कथानक लिहिले जात आहे आणि चित्रपटाद्वारे हे सादरही होत आहे. लेखकाच्या मृत्यूनंतर पाच दशके उलटून देखील जेम्स बॉण्डचे गारुड प्रेक्षकांच्या मनावर अजूनही जिवंत आहेत. अर्थात ह्या सर्वांची सुरुवात ज्या इयान फ्लेमिंगच्या लेखणीतून साकारली. एका संपन्न परिवारामध्ये इयान फ्लेमिंग यांचा जन्म झाला. त्यांनी ईटन, सॅण्डहर्स्टसह म्युनिख आणि जिनेव्हा युनिव्हर्सिटीतून शिक्षण घेतले. इयान यांचे वडील व्हॅलेन्टाईन फ्लेमिंग ब्रिटिश संसदेचे सदस्य होते तर आजोबा रॉबर्ट फ्लेमिंग स्कॉटिश अमेरिकन इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट आणि मर्चन्ट बँक रॉबर्ट फ्लेमिंग अ‍ॅण्ड कंपनीचे संस्थापक होते. इयान फ्लेमिंग यांचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या अनेक नोकऱ्या केल्या.

या नोकऱ्यांदरम्यान आलेला अनुभवच त्यांना जेम्स बॉण्डचे पात्र हुबेहूब साकारण्यात झाला असे म्हटले जाते. दुसऱ्या महायुध्दाच्या काळात इयान यांनी ब्रिटनच्या नाविक दलाच्या गुप्तहेर खात्यात नोकरी केली आणि त्याच ठिकाणी काम करताना त्यांच्या डोक्यात साकारले ऑपरेशन गोल्डन आयचे कथानक. याच दरम्यान युनिटो २० असॉल्ट युनिट आणि टी फोर्स ह्या दोन गुप्तहेर संघटना उभारण्याचे काम त्यांच्या देखरेखीखाली झाले. युद्धकाळातील ही नोकरी आणि त्यानंतर केलेल्या पत्रकारितेतील नोकरीने जेम्स बॉण्डकरिता भरपूर खाद्य इयान यांना उपलब्ध झाले. या अनुभवावरच आधारित १९५२ मध्ये पृथ्वीतलावर अवतरला जेम्स बॉण्ड ००७. जेम्स बॉण्डचे नाव सांगण्याची पद्धत देखील खास अशीच होती, 'माय नेम इज बॉण्ड जेम्स बॉण्ड'. याच पध्दतीने इयान यांचा परिचय आपल्या हिंदी चित्रपटसृष्टीच्या इस्टाईलने करायचा झाला तर 'नाम है फ्लेमिंग, इयान फ्लेमिंग...रिश्ते में तो हम जेम्स बॉण्ड के बाप लगते है' इयान यांनी साकारलेल्या जेम्स बॉण्डवर आजवर २४ चित्रपट झाले आहेत. जेम्स बॉण्ड म्हणजे तंदुरुस्त, चतुर आणि देखणा एजंट आहे. पण त्याला काही व्यसनेदेखील आहेत. दारू पिणे, सिगरेट पिणे, जुगार खेळणे तसेच त्याला बायकांमध्ये विशेष रुचि आहे. तंत्रज्ञानाची आवड असल्याने तो अ‍ॅडव्हान्स टेक्नॉलॉजीची हत्यारे आणि गाड्या वापरतो. तो शार्पशूटर आहे, हत्यार नसतानाही समोरच्या दुश्मनावर विजय प्राप्त करू शकतो. त्याला स्केटिंग, स्कीइंग, स्विमिंग, गोल्फ येते. लोकांना मारण्यात त्याला काहीही वाटत नाही, पण त्याला ऑर्डर असल्याशिवाय किंवा स्वतःचा बचाव करण्यासाठी, बदला घेण्यासाठीच तो लोकांचे जीव घेतो.

जेम्स बॉण्डवर आलेल्या चित्रपटात सर्वात आधी आला तो १९६२ साली डॉक्टर नो इओन प्रॉडक्शनने निर्मित केलेल्या या चित्रपटात शॉन कॉनरीने जेम्स बॉण्ड साकारला होता. हा इयान फ्लेमिंग यांच्या कादंबरीवर आधारीत चित्रपट होता. त्यानंतर १९६३ साली आला 'फ्रॉम रशिया विथ लव' हा चित्रपटदेखील इओन प्रॉडक्शनची निर्मिती होता. शॉन कॉनरी बॉण्ड होते. १९५७ मध्ये इयान यांच्या प्रकाशित झालेल्या कादंबरीवर हा चित्रपट बेतलेला होता. या चित्रपटाने कमाईच्या बाबतीत पहिल्या बॉण्डपटाला कैकपटीने मागे टाकले आणि जेम्स बॉण्ड जगभरात प्रसिध्दी पावला. तिसरा चित्रपट 'गोल्डफिंगर' १९६४ साली आलेल्या या चित्रपटात शॉन कॉनरी बॉण्ड आणि इयान यांच्या याच नावाने प्रसिध्द असलेल्या कादंबरीवर चित्रपट बेतला होता. या चित्रपटाला बॉण्डपटात प्रथमच अ‍ॅकेडमी अ‍ॅवार्ड मिळाला. चित्रपटाचा खर्च प्रदर्शनानंतर दोन आठवड्यातच वसूल झाला. नंतर १९६५ मध्ये चौथा बॉण्ड पट आला 'थंडरबॉल'. यात शॉन कॉनरीच पुन्हा जेम्स बॉण्ड होते. इयान यांच्या याच नावाच्या कादंबरीवर आधारित या बॉण्डपटाने १४१.२ मिलियन डॉलरची कमाई करून आधीच्या तिन्ही बॉण्डपटांना मागे टाकले. यानंतर मात्र इयान यांच्या कादंबरीव्यतिरिक्त कथानक असलेला 'यू ओन्ली लिव ट्वाईस' हा बॉण्डपट आला. यात शॉन कॉनरी बॉण्ड होते. या चित्रपटालाही प्रेक्षकांनी डोक्यावर घेतले आणि १११ मिलियन डॉलरची कमाई या बॉण्डपटाने केली. शॉन कॉनरी बॉण्ड असलेला सहावा चित्रपट आला १९६९ मध्ये ऑन हर मॅजेस्टिज सिक्रेट सर्व्हिस. याचे कथानक इयान फ्लेमिंग यांच्या याच नावाच्या कादंबरीवरून होते. चित्रपट चांगला झाला, पण आधीच्या बॉण्डपटांची प्रसिध्दी आणि कमाई दुर्दैवाने करू शकला नाही. या चित्रपटानंतर शॉन कॉनरी यांनी बॉण्डपटातून निवृत्त होण्याची घोषणा केली. मात्र तरीही १९७१ मध्ये आलेल्या 'डायमंड्स आर फॉर एव्हर' या चित्रपटात त्यांनी बॉण्ड साकारला. इयान फ्लेमिंगच्या कादंबरीवर आधारित या चित्रपटात बॉण्ड हिऱ्यांची स्मगलिंग रोखताना दाखविण्यात आला होता. चित्रपट यशस्वी ठरला, पण समीक्षकांच्या पातळीवर नकारात्मक प्रतिक्रिया मिळाल्यात. यानंतर शॉन कॉनरी यांनी बॉण्डपट केला नाही. यानंतर बॉण्डपटातील आठवा चित्रपट आला 'लिव अ‍ॅण्ड लेट डाय'. या चित्रपटात रॉजर मूर यांनी बॉण्ड साकारला होता.





निर्मात्यांना शॉन कॉनरीच बॉण्ड म्हणून अपेक्षित होता. मात्र त्यांनी नकार दिल्यानंतर रॉजर मूर यांनी ही भूमिका साकारली. इयान फ्लेमिंग यांच्या कादंबरीवर आधारित या चित्रपटात ड्रग माफियांचा पर्दाफाश करणारा या बॉण्डपटाने आपली जादू प्रेक्षकांवर कायम राखत अ‍ॅकॅडमी अ‍ॅवार्डसाठी नामांकनदेखील मिळविले. बॉण्डपटातील नववा चित्रपट आणि रॉजर मूर यांचा दुसरा बॉण्डपट 'द मॅन विथ द गोल्डन गन' याचे कथानक इयान फ्लेमिंग यांचे नव्हते.

बॉण्डपटातील सर्वात खराब चित्रपट म्हणून हा ओळखला जातो. यात बॉण्डपेक्षा क्रिस्तोफर ली यांनी साकारलेला खलनायक प्रेक्षकांच्या पसंतीला उतरला. असे असूनही बॉण्डपटातील सर्वाधिक कमाई करणाऱ्या चार चित्रपटांपैकी हा एक चित्रपट आहे. यानंतर रॉजर मूर यांच्या तिसरा तर बॉण्डपटातील दहावा चित्रपट 'स्पाय हू लव्ह मी' आला. या चित्रपटाचे टायटल फक्त इयान फ्लेमिग यांच्या कादंबरीचे होते. या चित्रपटाने प्रेक्षकांबरोबरच समीक्षकांचीही वाहवा मिळविली. तीन अ‍ॅकॅडमी अ‍ॅवार्डकरिता नामांकनदेखील मिळाले. १९७९ मध्ये मूनरेकर हा बॉण्डपटातील ११ वा व रॉजर मूर यांचा चौथा बॉण्डपट. स्पेस शटल चोरीचा शोध घेणाऱ्या या बॉण्डपटातील साहसदृश्यांनी प्रेक्षकांच्या डोळ्याचे पारणे फेडले. सर्वाधिक निर्मिती मूल्य असणाऱ्या चित्रपटाने आजवरच्या सर्वच बॉण्डपटांपेक्षा अधिक कमाई केली. रॉजर मूर यांचा पाचवा आणि बॉण्डपटातील १२ वा चित्रपट 'फॉर युवर आइज ओन्ली' फ्लेमिंग यांच्या दोन लघुकथांचे कथानक एकत्र करून रिचर्ड मॅब्यून आणि मायकल जी विल्सन यांनी या चित्रपटाची पटकथा लिहिली होती.

१९५.३ मिलियन डॉलरची कमाई करणारा हा बॉण्डपट होता. ऑक्टोपसी हा बॉण्डपटातील १३ वा व रॉजर मूर यांचा सहावा बॉण्डपट. चित्रपटाचे टायटल फ्लेमिंग यांची लघुकथा ऑक्टोपसीवरून घेतले होते. शीतयुद्धावर आधारीत कथानक असलेल्या या चित्रपटाची खासियत म्हणजे आजवर बॉण्डपटांची निर्मिती करणाऱ्या इओन प्रॉडक्शनने या चित्रपटाची निर्मिती केली नव्हती. इयान यांची 'फ्रम ए व्यू टू किल' या लघुकथेवर आधारित याच नावाचा चित्रपट १९८५ मध्ये आला. रॉजर मूर यांचा सातवा आणि १४ वा बॉण्डपट आहे.






# ज्येष्ठ कव्वाली गायक अजीज नाजा


**अजीज नाजा यांचा आवाज म्हणजे देवाने दिलेली देणगी होती. अजीज नाझा ही भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात प्रसिद्ध कव्वाली पार्श्वगायक होते.अझीझ नाझा यांचे पूर्ण नाव अब्दुल अझीझ कुंजी मारकर होते.त्यांचा जन्म मुंबईत एका मलबारी मुस्लिम कुटुंबात झाला.वयाच्या ९ व्या वर्षीच त्यांनी वडील गमावले.त्यानंतर ते ऑर्केस्ट्रामध्ये सामील झाले आणि लता मंगेशकरांची गाणी म्हणू लागले. काही काळानंतर ते प्रसिद्ध कव्वाल हम तो लूट लिया मिल के हुस्न वाले ने फेम इस्माईल आझाद यांच्या पार्टीत कोरस गायक म्हणून सामील झाले.**

हळूहळू त्यांना वैयक्तिक कव्वाली गायक म्हणून ओळख मिळाली. त्यांनी १९५८ मध्ये ग्रामोफोन कंपनी लिमिटेडशी करार केला. १९६२ मध्ये त्यांचा अल्बम जिया नहीं माना रिलीज झाला आणि तो खूप हिट झाला.या अल्बममुळे त्यांना प्रसिद्ध कव्वाल म्हणून मान्यता झाले. १९६८ मध्ये त्यांची रेकॉर्ड निगाह ए करम रिलीज झाली आणि ती कव्वाली चाहत्यांमध्ये खूप लोकप्रिय झाला. पण अजीज नाजा यांना खरे यश १९७० मध्ये मिळाले, जेव्हा त्यांची सर्वकालीन हिट झूम बराबर झूम शराबी ही कव्वाली कोलंबिया म्युझिक कंपनीने रिलीज केली आणि यशाचे सर्व रेकॉर्ड या क्रमांकाने मोडले.अजीज नाजा यांची कव्वाली- 'चढ़ता सूरज धीरे-धीरे ढलता है ढल जाएगा... आजही लोकप्रिय आहे.१९७३ मध्ये 'मेरे गरीब नवाज' हा चित्रपट प्रदर्शित झाला.चित्रपटाच्या मध्यंतरात अझीझ नाझा यांची झूम बराबर ही कव्वाली दाखवण्यात येत असे. या मुळे 'मेरे गरीब नवाज' या चित्रपटाला लक्षणीय यश मिळाले.१९७४ मध्ये आय.एस.जोहर यांनी त्यांच्या फाईव्ह रायफल्स या चित्रपटात झूम बराबर झूम शराबी ही कव्वाली घेतली.त्यांची 'झूम बराबर झूम शराबी ही कव्वाली त्या वर्षी बिनाका गीतमालाच्या टॉप १० यादीत सलग २० आठवडे वाजवली गेली होती.झूम बराबर झूम शराबी हा अझीझ नाझा यांच्या कारकिर्दीचा टर्निंग पॉइंट होता.या जबरदस्त हिटनंतर अझीझ नाझा पार्श्वगायक म्हणूनही मोठे नाव बनले. रफू चक्कर (१९७५), फकिरा (१९७६), लैला मजनू (१९७६), नेहले पे देहला (१९७६), आणि तृष्णा (१९७८) यांसारख्या अनेक चित्रपटांमध्ये त्यांनी गाणी गायली. तृष्णा मध्ये त्याने एका खास भूमिकेत काम केले आणि हुस्न वाले किसी के यार नहीं होते हैं हे गाणे त्याच्यावर चित्रित करण्यात आले. अजीज नाजा यांनी 'पालकी', 'राम और श्याम', 'साथी' आणि 'संघर्ष' या चार चित्रपटांमध्ये संगीत दिग्दर्शक नौशाद यांना सहाय्य केले होते.





१९८० मध्ये त्यांनी आत्माराम निर्मित प्यार के राही चित्रपटासाठी संगीत आणि दिग्दर्शन केले. त्यांनी पार्श्वगायक मोहम्मद रफी, किशोर कुमार, महेंद्र कपूर, आशा भोसले यांच्यासमवेत गीते गायली व संगीत दिग्दर्शक मदन मोहन, राजेश रोशन, आर. डी. बर्मन, मोहम्मद झहूर खय्याम, लक्ष्मीकांत प्यारेलाल, कल्याणजी आनंदजी, रवींद्र जैन यांच्यासोबत काम केले. १९८३ मध्ये त्यांनी मुंबई शहरातील सर्व कव्वाली गायकांना एकत्र आणून बॉम्बे कव्वाल असोसिएशन स्थापन केली होती. पण नंतर त्यांच्या आजारपणामुळे आणि नंतर त्यांच्या निधनानंतर ही संघटना संपली. मुज्तबा अजीज नाजा हा कव्वाल अजीज नाजा यांचा मुलगा आहे. मुज्तबा पण गायक असून देश-विदेशातील कार्यक्रमांमध्ये ही कव्वाली गाऊन आपल्या वडिलांची परंपरा पुढे नेत आहेत. ही कव्वाली मधुर भांडारकर यांच्या २००७ मध्ये आलेल्या इंदू सरकार या चित्रपटातही वापरण्यात आली होती. अजीज नाजा यांचे ८ ऑक्टोबर १९९२ रोजी निधन झाले.



# 'अखंड-२' सापडला अडचणीत



नंदामुरी बालकृष्ण यांची बहुप्रतिक्षित 'अखंड २' अचानक मोठ्या अडचणीत अडकली असून रिलीजच्या काही तास आधीच चित्रपट अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्यात आला आहे. २०२१ च्या सुपरहिट 'अखंडा'चा हा भव्य सिक्वेल ५ डिसेंबर २०२५ रोजी जगभर रिलीज होणार होता आणि ४ डिसेंबरला पेड प्रिमियरचीही योजना होती. पण रिलीजच्या अगोदरच सर्व शो रद्द करण्यात आले आणि पूर्ण इंडस्ट्रीला धक्का बसला.

४ डिसेंबरपासूनच थिएटर बुकिंगमध्ये गोंधळ सुरू झाला. संध्याकाळपर्यंत पेड प्रिमियर अधिकृतरीत्या रद्द झाले. परदेशातील केडीएमएसही वेळेवर न पोहोचल्याने वितरकांना अखेरच्या क्षणी शो काढावे लागले. त्यामुळे बालकृष्ण यांच्या चाहत्यांमध्ये मोठी निराशा पसरली.

यानंतर १४ रील्स प्लस या निर्मिती संस्थेने सोशल मीडियावर घोषणा केली की अपरिहार्य परिस्थितीमुळे 'अखंड-२' रिलीज करता येत नाहीये. त्यांनी हेही सांगितले की टीम सातत्याने प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करत आहे, पण नवीन रिलीज डेट केवळ आर्थिक अडथळे दूर झाल्यावरच जाहीर केली जाईल. म्हणजेच हा साधा पोस्टपोनमेंट नसून गंभीर आर्थिक संकट आहे, हे स्पष्ट झाले.

द इकॉनॉमिक टाइम्सच्या माहितीनुसार, चित्रपटाच्या रिलीजवर मद्रास हायकोर्टाने स्थगिती घातली आहे. ईरोस इंटरनॅशनलने न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेमध्ये त्यांनी १४ रील्स एंटरटेन्मेंटविरुद्ध सुमारे २८ कोटी रुपयांच्या दाव्याचा उल्लेख केला. ईरोसने असा आरोप केला की चित्रपट '१४ रील्स प्लस एलएलपी' या नावाने रिलीज करण्यामागे आर्थिक जबाबदाऱ्या टाळण्याचा प्रयत्न दिसतो. त्यामुळे न्यायालयाने पुढील आदेश येईपर्यंत चित्रपटाचा कोणताही थिएटर, ओटीटी किंवा व्यावसायिक रिलीज रोखण्याचे निर्देश दिले.

या न्यायालयीन आदेशामुळे आणि आर्थिक वाद न सुटल्याने 'अखंड २' पूर्णपणे अडकल्याची स्थिती आहे. बालकृष्ण यांची प्रचंड लोकप्रियता, सिक्वेलचा मोठा स्केल आणि इंडस्ट्रीत निर्माण झालेला जोरदार उत्साह लक्षात घेता हा धक्का अनपेक्षित आहे. आता चाहत्यांना या दमदार 'अखंडा' अवताराच्या पुनरागमनासाठी आणखी वाट पाहावी लागणार असून संपूर्ण लक्ष निर्मात्यांनी हे कायदेशीर आणि आर्थिक प्रश्न कितपत लवकर सोडवतात याकडे लागले आहे.

## काटेकोर शाहरुख

बॉलीवूड अभिनेता शाहरुख खानचा 'किंग' हा चित्रपट प्रदर्शित होण्यासाठी अजून वर्षभरापेक्षा जास्त वेळ बाकी आहे. मात्र गेल्या काही दिवसांत या चित्रपटाचे लीक झालेले तपशील आणि फर्स्ट लुक यांनी मार्केटमध्ये जोरदार माहोल तयार केले आहे. शाहरुखच्या ६०व्या वाढदिवशी या चित्रपटाचा फर्स्ट लुक जाहीर केला होता. या पोस्टरपासून ते फर्स्ट लुकपर्यंतचा प्रत्येक टप्पा शाहरुख स्वत: पाहत, तपासत आहे. फर्स्ट लुक अंतिम करण्याच्या प्रक्रियेत तो सलग दोन रात्री जागा राहिला होता. इतकेच नव्हे तर टीझरमध्ये ऐकू येणारा संवादही त्याने स्वत: लिहिला होता. ही माहिती 'मॅथ एंटरटेनमेंट'चे संस्थापक राजीव चुडासमा यांनी दिली. 'किंग'साठीचे पोस्टर आणि फर्स्ट लुक टीझर यावरदेखील त्यांनीच काम केले आहे. राजीव सांगतात की, शाहरुख स्वत: टायटल रिव्हील परफेक्ट व्हावे यावर आग्रही होता. त्यामुळे तो एडिटर्ससोबत रात्रभर बसून कटस् पाहत राहिला. टायटल रिव्हीलचे अंतिम एडिट तर अगदी शेवटच्या क्षणी केले गेले.

ट्रेलर तज्ज्ञ निलेश कटारिया सांगतात की त्यांच्या टीमकडे हे तयार करण्यासाठी फक्त दोन दिवसांचा वेळ होता. कारण चित्रपटाचे केवळ २० टक्के शूटिंग पूर्ण झाले असल्याने वापरता येण्यासारखे फुटेज खूपच कमी होते. मोठ्या चर्चेनंतर टायटल रिव्हील पूर्णपणे व्हॉईस ओव्हरसोबत करण्याचा निर्णय घेतला गेला. तो व्हॉइस ओव्हर चित्रपटातील मूळ भाग नव्हता. सिद्धार्थ आणि शाहरुख तिथेच बसून तो लिहू लागले.

'किंग'च्या पोस्टरमध्ये शाहरुखचा मध्यम लांबीचा एक पोर्ट्रेट शॉट आहे. यामध्ये त्याच्या चेहऱ्यावर गंभीर भाव आहेत. सुरुवातीला यासाठी दुसऱ्या प्रकारचे पोस्टर तयार होणार होते, मात्र त्याच काळात शाहरुखचा खांदा दुखावल्यामुळे या शॉटवर आधारित पोस्टर फायनल करावे लागले.



राजीव सांगतात की हे पोस्टर फायनल करतानाही शाहरुख सलग दोन रात्री जागा राहिला होता. या चतुरस्त्रपणाबाबत आणि काटेकोरपणाबाबत शाहरुखची अनेकांनी सोशल मीडियावर प्रशंसा केली आहे.

## उत्सुकता 'बॉर्डर-२'च्या टीझरची




चालू वर्ष संपण्यास आता २०-२५ दिवस उरले आहेत. या वर्षाखेरीस मोठ्या चित्रपटांची रेलचेल पाहायला मिळणार आहे. रणवीर सिंगचा 'धुरंधर' नुकताच थिएटरमध्ये आला आहे, तर डिसेंबरच्या अखेरीस आणखी दोन बडे चित्रपट प्रदर्शित होत आहे. पण त्याआधी सनी देओल पुन्हा एकदा दमदार एंट्री घेणार आहेत. यावर्षी त्यांचा 'जाट' हा चित्रपट आला होता. तसेच पुढच्या वर्षासाठी त्यांनी दोन मोठ्या प्रोजेक्टस्ची घोषणा केली आहे. त्यातील सर्वात चर्चेत असलेला चित्रपट म्हणजे 'बॉर्डर २'. या चित्रपटातील दोन कलाकारांचे लुक आधीच समोर आले आहेत. आता १६ डिसेंबर रोजी या चित्रपटाची पहिली अधिकृत झलक म्हणजेच टीझर प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. त्यामुळे प्रेक्षकांची उत्सुकता कमालीची वाढली आहे.

या चित्रपटात सनी देओल अनेक वर्षांनी आपल्या जुन्या दमदार अंदाजात दिसणार आहे. पण यावेळी त्यांच्यासोबत पूर्णपणे नवी टीम असेल. १६ डिसेंबर या दिवसाची निवड करण्याचे कारण म्हणजे भारतात हा दिवस 'विजय दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवशी टीझर रिलीज करणे हे सैनिकांच्या शौर्याला सलाम करणारे पाऊल मानले जात आहे. सनी देओलचा देशभक्तीच्या भूमिकांशी विशेष संबंध राहिला आहे. 'गदर' आणि 'गदर २' ला मिळालेल्या मोठ्या प्रतिसादानंतर आता 'बॉर्डर २' कडूनही तशीच अपेक्षा आहे. या चित्रपटात सनी देओलसोबत दिलजीत दोसांझ, वरुण धवन आणि अहान शेट्टी असतील. आता 'बॉर्डर २' चा टीझर यावर्षी आलेल्या इतर मोठ्या चित्रपटांच्या टीझर-ट्रेलरचे रेकॉर्ड मोडतो का हे पाहायचे.

## आई सुपरस्टार; पण मुले अनभिज्ञ!

एकेकाळी बॉलीवूडची 'धकधक गर्ल' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अभिनेत्री माधुरी दीक्षित सध्या त्यांच्या येऊ घातलेल्या 'मिसेस देशपांडे'या मालिकेमुळे चर्चेत आहेत. ही एक सायको थ्रिलर मालिका असून ती १९ डिसेंबरला जिओहॉटस्टारवर प्रदर्शित होणार आहे. या मालिकेच्या प्रमोशनदरम्यान माधुरी यांनी त्यांच्या मुलांबद्दल एक मनोरंजक गोष्ट सांगितली.रणवीर इलाहाबादिया यांच्या पॉडकास्टमध्ये माधुरी म्हणाल्या की, काही वर्षांपूर्वी आम्ही भारतामध्ये परत आलो; पण तोवर मुलांना माझ्या अभिनयाविषयी आणि लोकप्रियतेविषयी कसलीच कल्पना नव्हती. गंमत म्हणजे एकदा आम्ही संपूर्ण कुटुंब चित्रपट पाहायला गेलो होतो. सिनेमा संपल्यानंतर थिएटरबाहेर येताच तेथे फोटोग्राफर्सची गर्दी झाली आणि त्यांनी माझ्यासह कुटुंबाचे फोटो घेणे सुरू केले. अचानक इतके फ्लॅशेस पाहून मुलं चकित झाली आणि त्यांनी मला विचारले, मॉम, हे काय चालले आहे? तेव्हा माधुरी यांनी त्यांना सांगितले की त्या अभिनेत्री आहेत. त्यानंतर मुलांना थोडीफार कल्पना आली. पण तरीही आपल्या आईचा आयकॉनिक स्टेटस काय आहे, हे मुलांना समजले नव्हते. मग पुढे जाऊन शाळेतील मित्रांकडून 'तुम्ही किती नशीबवान आहात, माधुरी दीक्षित तुमची आई आहे' अशा प्रतिक्रिया ऐकायला मिळाल्यानंतर त्यांना उलगडा झाला. पण तरीही



त्या काळात मुलांनी आपल्या चित्रपटांकडे विशेष लक्ष दिले नव्हते, असे माधुरी सांगतात.

नंतर जेव्हा मुले कॉलेजला गेली आणि त्यांचे भारतीय मित्र झाले, तेव्हा त्यांनी माधुरीचे चित्रपट पाहायला सुरुवात केली. मोठ्या मुलाने पहिल्यांदा 'दिल तो पागल आहे पाहिला तेव्हा त्याला हा चित्रपट खूप आवडला. त्याने माधुरींना याआधी हा चित्रपट का दाखवला नाही, असा प्रश्न विचारला. यावर 'तुम्हाला नेहमी कार्टून किंवा सुपरहिरो चित्रपट आवडायचे आणि त्यावेळी तुम्हाला हिंदी कळत नव्हते' असे उत्तर माधुरीने दिले.

## १६० कोटी मानधन?



सिनेकलाकारांचे मानधन हा बी-टाऊनमध्ये आणि चाहत्यांमध्ये नेहमीच चर्चेत राहिलेला विषय आहे. पूर्वीच्या काळी अभिनेत्यांच्या मानधनाचे आकडे मोठे असायचे; पण गेल्या दोन-तीन दशकांमध्ये अभिनेत्रीही यामध्ये मागे राहिलेल्या नाहीत. कलाकारांना द्याव्या लागणाऱ्या या भरभक्कम मानधनांमुळे सिनेमाचे बजेटही वाढत चालले आहे. सध्या याची चर्चा होण्याचे कारण म्हणजे अभिनेता प्रभास! संदीप रेड्डी वांगा त्यांचा स्पिरिट हा चित्रपट मोठ्या कॅनव्हासवर बनवत आहेत. या चित्रपटाचे बजेट ३०० कोटी रुपये आहे. पण या चित्रपटासाठी प्रभासला दिले जाणारे मानधन आश्चर्यकारक आहे. डेक्कन क्रॉनिकलमधील वृत्तानुसार, प्रभासने 'स्पिरिट'साठी ₹१६० कोटी रुपये इतके भरमसाठ मानधन घेतले आहेत. भारतीय चित्रपटसृष्टीतील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट असलेल्या 'बाहुबली २' साठी प्रभासने २५ कोटी रुपये घेतले होते. त्यानंतर प्रभासचे मानधन सातत्याने वाढत आहे. आदिपुरुष, सलार, कलकी आणि द राजा साब या चित्रपटांसाठीचे त्यांचे मानधन ₹१०० ते ₹१५० कोटींच्या दरम्यान होते. ही आकडेवारी पाहता 'स्पिरिट'साठी त्याने आतापर्यंतच्या कारकिर्दीतील सर्वाधिक मानधनाची मागणी केली आहे.

# मुंबई महानगर क्षेत्रातील १९ रेडीमिक्स प्लान्ट बंद

मुंबई

**महाराष्ट्र** प्रदूषण नियंत्रण मंडळाने मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रातील वायू प्रदूषण करणाऱ्या १९ रेडी मिक्स काँक्रीट प्लान्ट बंद केले आहेत. देवनार,गोवंडी येथील चार प्लान्टचा यात समावेश आहे. यातील तीन उद्योगांची प्रत्येकी पाच लाख रुपयांची बँक हमी जप्त करण्यात आली आहे. मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रामध्ये मंडळाची ३२ ठिकाणी वायू गुणवत्ता निरीक्षण केंद्र सुरू आहेत. त्यांपैकी १४ केंद्र मुंबईत आहेत; तर उर्वरित केंद्र ठाणे, कल्याण, नवी मुंबई,पनवेल येथे आहेत. याद्वारे हवा गुणवत्ता निर्देशांक मोजला जातो. तो केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसारित केला जातो. हवेच्या गुणवत्तेचे निरीक्षण करण्यासाठी मंडळाकडे एकूण २२ मोबाईल मॉनिटरिंग व्हॅन आहेत. त्याद्वारे राज्यामध्ये गरजेनुसार वातावरणीय हवा गुणवत्ता तपासणी केली जाते.

### देवनार-गोवंडीतील ४ प्रकल्पांचा समावेश

# भीम अनुयायांची भुयारी मेट्रो स्थानकांवर गर्दी

मुंबई

**भारतरत्न** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादनासाठी मोठ्या संख्येने भीमअनुयायी मुंबईतील चैत्यभूमीवर दाखल होत आहेत. अभिवादनानंतर इतर स्थळांना भेट देताना मुंबई भुयारी मेट्रो पाहण्याकडे अनुयायांमध्ये मोठी उत्सुकता आहे. त्यामुळे अनेक स्थानकांवर अनुयायांची गर्दी दिसते.

महापरिनिर्वाण दिनी चैत्यभूमीवर डॉ. बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी राज्यभरातील खेड्यापाड्यातून भीमअनुयायी शिवाजी पार्क चैत्यभूमीवर दाखल झाले आहेत. अभिवादन झाल्यानंतर भीमअनुयायी मुंबईतील पर्यटन स्थळांना भेट देत असतात. यंदा मुंबईत नव्याने सुरू करण्यात आलेल्या मुंबई भुयारी मेट्रोची मोठी चर्चा सर्वत्र आहे.




त्याचे आकर्षण भीमअनुयायांमध्येही आहे. अमरावती येथून आलेल्या सखुबाई कांबळे यांना भुयारी मेट्रो कशी धावते?, हे पाहायचे आहे तर परभणीच्या अरुण गायकवाड यांनाही मेट्रोचा भुयार कसा बनवला याचे मोठे आश्चर्य आहे. नाशिकच्या सविता भालेराव यांनाही जमिनीखाली असलेल्या भुयारी मेट्रोचे मोठे कौतुक वाटते. मात्र खेड्यापाड्यातील गरीब लोकांना मेट्रोचे महाग तिकीट परवडणार नाही. त्यामुळे इतरांनी लोकल किंवा बसने प्रवास करणे सोयीचे मानले असल्याचे पुष्पा गोरड यांनी सांगितले.

# किल्ले राजगड प्रदक्षिणेचे ४०वे वर्ष दी नेचर लव्हर्सतर्फे भव्य आयोजन

मुंबई

**निसर्गप्रेमींसाठी** पर्वणी ठरणारी किल्ले राजगड प्रदक्षिणा यावर्षी आपल्या ४० व्या वर्षात भव्यतेने साजरी होणार आहे. दी नेचर लव्हर्स संस्थेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त २५ ते २८ डिसेंबर २०२५ दरम्यान या प्रदक्षिणेचे विशेष आयोजन करण्यात आले आहे. निसर्ग, इतिहास आणि साहसाचा संगम अनुभवण्यासाठी राज्यभरातील गिर्यारोहकांचा उत्स्फुर्त सहभाग अपेक्षित आहे.

सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त इतिहास अभ्यासक भगवान चिले यांचे व्याख्यान आणि दृकश्राव्य सादरीकरण ७ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ४.३० वाजता, वनमाळी सभागृह, दादर, पश्चिम येथे होणार आहे. हे व्याख्यान सर्वांसाठी विनामूल्य असून राजगडाचा इतिहास आणि निसर्गसंवर्धनावर मार्गदर्शन केले जाणार आहे.

# सरकार व पालिकेच्या जागा अतिक्रमणासाठी मोकळे रान! मुंबई उच्च न्यायालयाची चिंता

मुंबई

**राज्य** सरकार किंवा महापालिकेच्या जागा जणू अतिक्रमणांसाठी मोकळे रान करून दिल्या आहेत. हे सध्याच्या घडीला सर्वमान्य चित्र आहे. या जमिनींवर अतिक्रमणाला मुभा दिली जाते आणि नंतर झोपडपट्ट्यांच्या विकासाच्या नावाखाली अतिक्रमण करणाऱ्या झोपडीधारकांना पूर्णपणे मोफत घरे दिली जातात. राज्य सरकार किंवा पालिका त्यांच्या जमिनीवरील अतिक्रमणे हटवण्याची काळजी घेत नाही हे दुर्दैवी आहे, अशा शब्दांत चिंता व्यक्त करतानाच उच्च न्यायालयाने कांदिवली येथील एसआरए योजनेच्या अंमलबजावणीवर कडक शब्दांत ताशेरे ओढले.

कांदिवली पश्चिमेकडील न्यू श्रीकृष्णा एसआरए को. ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीने उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली आहे. एसआरए प्राधिकरण आणि राज्य सरकारला याचिकेत प्रतिवादी बनवले आहे. याचिकेवर न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठापुढे सुनावणी झाली. यावेळी खंडपीठाने एसआरए योजनेच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करतानाच पालिका आणि राज्य सरकारच्या निष्क्रियतेवर चिंता व्यक्त केली. सार्वजनिक जमिनींवर अतिक्रमण करण्यास मुभा दिली जाते.

# अनाथ मुलांसोबत संवाद साधताना मुख्यमंत्री भावूक

मुंबई

महायुती सरकारला आज एक वर्ष पूर्ण झाले. या वर्षपूर्तीनिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत अनाथ मुलांशी संवाद साधला. या वेळी मुलांनी आपली भावना व्यक्त केली आणि ते ऐकून मुख्यमंत्री भावूक झाले.

फडणवीस यांनी अनाथ मुलांसाठी एक टक्का आरक्षणाचा निर्णय घेतला होता. त्यामुळे अनेक अनाथ मुलांना सरकारी योजनांचा लाभ मिळत आहे. संवादाच्या वेळी एका लाभार्थ्याने म्हटले की, नशिबाच्या पलीकडे जाऊन आमच्यासाठी घेतलेला हा निर्णय, संवेदना आणि प्रयत्न आमचे आयुष्य बदलणारा ठरला. या निर्णयामुळे अनेक अनाथ मुलांच्या आयुष्यात सकारात्मक बदल झाले असून, त्यांनी मुख्यमंत्र्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

# पुणे महापालिका बस चालकांना तंबाखू सेवन-थुंकण्यास बंदी



पुणे

**पुणे** महानगरपालिका परिवहन महामंडळाने (पीएमपीएम) मार्गावर बस चालवताना चालक-वाहकांनी तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करू नये. तसेच सार्वजनिक ठिकाणी किंवा बसमध्ये थुंकू नये, असे आदेश दिले आहेत. महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक पंकज देवरे यांनी असे आदेश देत या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यावर कडक कारवाई करण्याची सूचना दिली आहे.

बस चालवताना अनेक चालकांकडून तंबाखू किंवा गुटखा सेवन करून बसमध्ये किंवा रस्त्यावर थुंकण्याच्या तक्रारी प्रशासनाकडे आल्या आहेत. त्यामुळे महामंडळाची प्रतिमा मलिन होत असल्याने सर्व चालक-वाहकांसह टाइमकिपर, गॅरेज सुपरवायझर, कंट्रोलर, चेकर आणि आगार व्यवस्थापकांना बस चालविताना तंबाखू, गुटख्याचे सेवन करू नये, सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यांवर थुंकू नये, प्रवाशांच्या आरोग्यास हानीकारक ठरेल असे कोणतेही गैरवर्तन करू नये, पुणे महानगरपालिका परिवहन महामंडळाची प्रतिमा मलिन होईल, असे वागू नये, आगार व बसस्थानक परिसर स्वच्छ ठेवावे असे आदेश दिले आहेत. या आदेशाचे पालन न करणाऱ्यावर एक हजार रुपयांचा दंड आकारला जाणार आहे.

# बँकेच्या लॉकरमधून शिवसेना नेत्याची रिव्हॉल्वर दागिने गायब

मुंबई

**कर्नाटक** बँकेच्या विलेपार्ले पूर्व शाखेतील लॉकरमधून शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि माजी आमदार कृष्णा हेगडे यांच्या लॉकरमधील मौल्यवान दागिने आणि परवानाधारक रिव्हॉल्वर चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे.

कृष्णा हेगडे आणि त्यांच्या कुटुंबीयांकडून कर्नाटक बँकेत गेल्या ४० वर्षांपासून बँकिंग सुविधांचा वापर केला जात आहे. हेगडे यांनी १९ सप्टेंबर २०२५ रोजी दागिने, रोकड व रिव्हॉल्वर लॉकरमध्ये ठेवली होती. मात्र २२ ऑक्टोबर २०२५ रोजी लॉकर उघडल्यावर काही रक्कम, दागिने आणि रिव्हॉल्वर गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले. या प्रकरणी हेगडे यांनी विलेपार्ले पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# लग्नाचे वय नसूनही दोन प्रौढ व्यक्ती 'लिव्ह-इन'मध्ये राहू शकतात

जयपूर

**लग्नासाठी** कायदेशीर वय गाठलेले नसतानाही एकत्र राहू इच्छिणारे दोन प्रौढ व्यक्ती लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहू शकतात, असा निर्णय राजस्थान उच्च न्यायालयाने दिला आहे. न्यायालयाने स्पष्ट केले की, एखाद्या व्यक्तीचे घटनात्मक अधिकार केवळ लग्नासाठी कायदेशीर वय गाठलेले नसल्यामुळे मर्यादित केले जाऊ शकत नाहीत.

कोटा येथील १८ वर्षीय महिला आणि १९ वर्षीय पुरूषाने संरक्षण मागण्यासाठी दाखल केलेल्या याचिकेवर न्यायमूर्ती अनुप धांड यांनी हा निर्णय दिला. दोघांनीही न्यायालयाला सांगितले की ते स्वेच्छेने एकत्र राहत आहेत आणि २७ ऑक्टोबर रोजी त्यांनी लिव्ह-इन करार केला होता.

### राजस्थान उच्च न्यायालयाचा निर्णय

याचिकाकर्त्यांनी असे म्हटले आहे की, महिलेच्या कुटुंबाने या नात्याला विरोध केला आणि त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली, परंतु कोटा पोलिसांनी त्यांच्या तक्रारीवर कोणतीही कारवाई केली नाही. सरकारचे प्रतिनिधित्व करणारे सरकारी वकील विवेक चौधरी यांनी असा युक्तिवाद केला की, पुरुषाचे वय पुरुषांसाठी कायदेशीर विवाहयोग्य वय असलेल्या २१ वर्षांपेक्षा कमी आहे. आहे. त्यामुळे त्याला लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये प्रवेश करण्याची परवानगी देऊ नये. न्यायालयाने हा युक्तिवाद फेटाळून लावत म्हटले की, केवळ याचिकाकर्त्यांचे लग्नाचे वय झाले नाही, म्हणून संविधानाच्या कलम २१ अंतर्गत जीवनाचा आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार हिरावून घेतला जाऊ शकत नाही.


# पालिकेच्या पंधरवड्यात २४ पुरुषांची नसबंदी

मुंबई

**महापालिकेकडून** पुरुष नसबंदी पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये एकूण २४ पुरुषांची नसबंदी करण्यात आली आहे. २१ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर २०२५ या कालावधीत या पुरुष आणि स्त्री नसबंदी शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

यंदाच्या पुरुष नसबंदी पंधरवड्याचे घोषवाक्य 'स्वस्थ व आनंदी कुटुंबाचे स्वप्न, पुरुषांच्या सहभागातूनच साकार' असे होते. कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया अंतर्गत स्त्री नसबंदी व पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया, तांबी बसविणे, गर्भनिरोधक गोळी, प्रचलित संतती प्रतिबंधक, अंतरा इंजेक्शन गर्भनिरोधक आदी साधनांचे वाटप करण्यात येते. पालिकेच्या एफ / दक्षिण कुटुंब कल्याण केंद्र विभागाला पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया प्रशिक्षण केंद्र म्हणून मान्यता मिळालेली आहे.

# नवाकाळ शब्दकोडे-१४५२



**आडवे शब्द –**

१. दोन वेळा, रोज दोनदा ४. एकाकी पडलेला ७. हत्तीच्या पाठीवरील आसन ९. शिंपल्यातला सजीव १३. चेहरामोहरा १४. पराक्रम, पुरुषार्थ १६. संत ज्ञानेश्वरांना कोरा कागद पाठवणारा योगी १७. इमारतीचे भक्कम लाकूड १९. प्रयत्न २१. क्षुद्र, अतिसामान्य २२. स्वर्गातील गंगा, गाजलेली जुनी नटी २४. अस्वीकार, असंमती २६. संतोष २७. पाय, कवितेतील भाग २८. सहजी उकरता येण्याजोगी मऊ जमीन ३०. परवानगी, अनुज्ञा ३३. शपथ ३४. चमत्कार ३६. घट्ट बासुंदी ३७. बंध ३८. परीट ४०. उत्सवाचा दिवस ४१. बगळा ४३. शेतकरी ४५. वटवट ४८. शिकारीच्या वेळी टेहळणीसाठी झाडावर उंच बांधलेली तात्पुरती बैठक ५०. अल्लड, नवशिका ५१. अदा ५३. दोषारोप ५५. कमतरता, उणीव ५७. धाक ५८. कलंकित ५९. टुमणे, लकडा ६१. मीठ ६३. मैत्री, स्नेह ६४. केंद्रभागी, मधल्या जागेत ६६. चषक ६७. वृक्ष, बाग, अरण्य ६८. व्यवस्थित ६९. कुटुंबाने ठोकलेला मुक्काम, कुटुंबाचे सामानसुमान ७१. लिव्हर ७४. गुळगुळीत व कडक ७५. दृष्टांत, प्रमाणपत्र, सर्टिफिकेट ७७. शाश्वत, चिरंतन ८०. कबुतर ८१. नशीब ८४. झाडाचे पान ८६. घोड्याचे नियंत्रण करणारी दोरी ८८. उंची दर्जाचा पांढरा दगड ९१. लहानपण ९२. प्रकाशाचा, वाऱ्याचा मोठा प्रवाह ९३. साठ मिनीटे ९५. तुझे (कवितेतच येणारा शब्द) ९६. शाईची जुनी लेखणी ९७. मिठी, आलिंगन ९८. गैरअर्थ, विपर्यास १००. सतत एकाच गोष्टीचे चिंतन १०३. हरवलेले १०५. गोवा-कोकणातील एक मोठे दैवत १०६. पाण्याचे धरण १०८. श्वेत, शुभ्र १०९. प्रश्न ११०. खोचक १११. हिस्सा ११२. सच्चरित्र

**उभे शब्द –**

१. दोन्हीकडून बोलणारा २. हस्तलिखित ३. वैपुल्य, विपुलता ५. खेळगडी, सोबती ६. गाण्यातील एक राग ७. शासकीय अधिकारी ८. शिल्लक, शेष १०. गळयात पडलेले लोढणे, झेंगट ११. तमाशा, लोकनाट्य १२. प्रसंग, उसंत १५. अनियंत्रित जमाव १७. निर्जनता, शांतता १८. अतिशय बोलणारा १९. मालक, स्वामी २०. घरामागचे आवार २१. उजेड, तेज, मुलींचे एक नाव २२. शाही पलंग २३. बांगड्यांचा मधुर ध्वनी २४. प्रारब्ध, भाग्य, प्राक्तन २५. बोटचेपेपणा २६. गवताचे पाते २८. जमिनीखाली बांधलेली वाट किंवा खोली २९. आकर्षण, मोह ३१. तोटा, हानी ३२. काठ, किनारा ३३. दूध आटलेले जनावर ३५. नेमस्त ३९. बळजबरी ४०. मार्ग, रस्ता ४२. सूक्ष्म तुकडा ४४. पती, दादला ४६. श्रीकृष्णाचा थोरला भाऊ ४७. आत्मीयता, स्नेह ४९. सतत, नेहमी ५२. मोठा, महा ५३. स्पष्ट, ठसठशीत ५४. मिश्रण, खिचडी ५६. काळोख ६०. बछडा ६२. कुटुंब ६३. एक फळभाजी, शिराळे ६५. उद्दिष्ट, साध्य ६७. भात वा नाचणीची पेज ७०. उत्साह, जोश ७२. मेहरबानी, अनुग्रह ७३. पोहण्यासाठी बांधलेला तलाव ७६. खलास ७८. कुबेराचा सेवक ७९. चपळाई ८२. नव्या पालवीचा ऋतू ८३. बुरशी ८५. जननी, जन्मदात्री ८७. कपोल ८९. बोभाटा, बभ्रा ९०. कंटाळा आणणारे ९१. भोट, मूर्ख ९२. शयन, निद्रा ९४. सांप्रत ९७. संरक्षक आवरण, चिलखत ९८. किंवा ९९. दोन तोंडांची पिशवी १०१. पैसेवाला, श्रीमंत १०२. बायकोचा भाऊ किंवा बहिणीचा पती १०४. त्रास, पीडा १०५. आवाज, ध्वनी १०७. उसळीचे एक कडधान्य •

**नवाकाळ कोडे क्रमांक १४५१ चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. मनीषा ४. खटाटोप ७. कठपुतळी ११. महनीय १३. सुरी १४. पळपुटा १५. त्रपा १६. सैल १७. रिता १८. तपमापक २१. क्षमा २३. सरता २४. यशस्वी २६. डर २७. शिष्य २९. रमणी ३१. नत्र ३३. यशोदा ३५. खांदा ३६. गौरीशंकर ४०. गुंड ४१. द्रूत ४२. गदाधर ४४. उपयोगी ४५. फासळ्या ४६. मीन ४८. कळवळा ५०. तग ५३. शाखा ५५. फूट ५६. लक्तरे ५८. रुग्ण ५९. काषाय ६०. नकलाकार ६४. घमेंड ६६. जलद ६७. दाट ६८. फितवणे ७०. रद्द ७१. दुरावा ७२. आनन ७४. पेला ७६. झोपा ७७. काडीमोड ७८. खाज ७९. बासन ८१. भालचंद्र ८३. रमल ८५. काप ८६. वारा ८७. कडबा ८९. खवट ९१. खातरजमा ९३. शमी ९४. मवसर ९५. वहाण ९७. फोल ९८. खवा ९९. भाऊबंदकी १०१. पाटव १०२. गड १०४. सह १०६. जर १०७. ललकारी ११०. वीर १११. बाणेदार ११३. नर ११४. ठोसा ११५. शीतल ११६. टवाळ ११७. रावस

**उभे शब्द** : १. यमनियम २. मनी ३. नियत ४. खरीप ५. टोप ६. पळस ७. कटाक्ष ८. पुत्र ९. तपासणी १०. बैल १२. हताश १३. सुमार १६. सैतान १९. पडदा २०. कशिदा २२. मारक २५. स्वीय २८. दोरी ३०. मरगळलेला ३२. त्रस्त ३४. शोकगीत ३५. खांडसरी ३६. गौतमी ३७. शंका ३८. वेंधळा ३९. उपरोक्त ४०. गुंफा ४३. दाव ४७. नशा ४९. तटवणे ५१. गरुड ५२. विषाद ५४. खानदान ५६. लष्करच्या भाकऱ्या भाजणे ५७. रेघ ५९. कालवाकालव ६१. कट ६२. काफिला ६३. रत ६५. मेंढी ६६. जरा ६९. वरीस ७१. दुपार ७२. आमोद ७३. नड ७४. पेज ७५. अचंबा ७८. खापर फोडणे ७९. बारा ८०. नवमी ८२. लड ८४. मखर ८५. कात ८६. वामा ८८. तवकील ९०. टवटवी ९१. खाण ९२. जल ९३. शवासन ९४. मदलसा ९६. हावरट १००. ऊर १०२. गबाळ १०३. बारव १०५. हरळी १०८. काशी १०९. रीत ११२. दारा

# इंडिगोची ४०० विमाने रद्द! प्रवाशी संतप्त

पान १ वरून

उड्डाणे कमी करणार आहेत आणि १० फेब्रुवारी २०२६ पर्यंत वाहतूक स्थिर होण्याची अपेक्षा आहे. एअरलाईन्सने कबूल केले की एफडीटीएल नियमांच्या दुसऱ्या टप्प्याच्या अंमलबजावणीतील चुकीच्या निर्णयामुळे आणि नियोजनातील त्रुटींमुळे व्यापक व्यत्यय निर्माण झाले. तर नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने (एमओसीए) इंडिगोच्या उड्डाण गोंधळाची गंभीर दखल घेतली आहे. नागरी विमान वाहतूक मंत्री के. राममोहन नायडू यांनी आढावा बैठकीत नागरी विमान वाहतुकीवर टीका केली आहे. के. राममोहन नायडू यांनी इंडिगोच्या मोठ्या प्रमाणात उड्डाणे रद्द झाल्याचा आढावा घेतला. विमानभाडे नियंत्रणात ठेवून तातडीने ऑपरेशन्स स्थिर करण्याचे निर्देश एअरलाईन्सला दिले. त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करताना राममोहन नायडू यांनी म्हटले आहे की, एअरलाईन्सकडे नवीन एफडीटीएल नियमांसाठी तयारी करण्यासाठी पुरेसा वेळ होता. परंतु सुरळीत विमान वाहतूक ठेवण्यात ते अयशस्वी ठरले. त्यांनी इंडिगोला तातडीने कामकाज सामान्य करण्याचे आणि सध्याच्या परिस्थितीमुळे विमान भाड्यात वाढ होणार नाही याची खात्री देण्याचे निर्देश दिले.

दिल्लीहून होणारी सर्व उड्डाणे आज रद्द करण्यात आली. तर चेन्नईहून संध्याकाळी ६ वाजेपर्यंत होणारी उड्डाणे रद्द करण्यात आली. बंगळुरू विमानतळावरून १०० तर हैदराबाद विमानतळावर ९० हून अधिक उड्डाणे रद्द करण्यात आली.

इंडिगोला अचानक मनुष्यबळाचा तुटवडा जाणवण्यामागे नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने कामाच्या तासांबाबत नव्याने बनवलेली नियमावली कारणीभूत ठरत आहे. ही नवी नियमावली दोन टप्प्यांमध्ये राबवली जात आहे. यातील पहिला टप्पा जुलै महिन्यात अंमलात आला, तर दुसऱ्या टप्प्याची अंमलबजावणी नोव्हेंबर महिन्यापासून सुरू झाली. डीजीसीएने बनवलेल्या या नियमांअंतर्गत, वैमानिकाचे कामाचे तास ४८ वरून ३६ करण्यात आले आहेत. शारीरिक आणि मानसिक थकवा कमी व्हावा हा यामागील उद्देश आहे. याशिवाय रात्री विमाने उतरवण्याची मुभा सहावरून दोनवर करण्यात आली आहे. दैनिक कामाचे ८ तास, साप्ताहिक कामाचे ३५ तास, मासिक कामाचे १२५ तास आणि वार्षिक १००० तास अशा मर्यादा घालून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे वैमानिकांची कमतरता निर्माण झाली आहे. इंडिगोची या बदलासाठी तयारी पुरेशी नव्हती. नोव्हेंबर-डिसेंबर हा वाढीव उड्डाणांचा काळ मानला जातो. सुट्ट्यांच्या काळात जवळपास ६ टक्के उड्डाणे अधिक असतात. एकीकडे ही वाढीव उड्डाणे आणि दुसरीकडे नियमांच्या मर्यादेतून घटलेले वापरण्याजोगे मनुष्यबळ अशा दुहेरी कात्रीत इंडिगो सध्या अडकली आहे. इंडिगोची रात्रीची उड्डाणेही सर्वाधिक आहेत. किंबहुना ते त्यांचे यशस्वी बिझनेस मॉडेल मानले जाते. आता रात्रीच्या उड्डाणांवरील मर्यादांचा दुहेरी फटका इंडिगोच्या सेवेला बसला. एकट्या नोव्हेंबर महिन्यात या कंपनीची १२३२ उड्डाणे रद्द झाली. तोच पाढा डिसेंबरमध्येही सुरूच राहिला.

## विमानसेवा गोंधळासाठी सरकारचे मॉडेल जबाबदार

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज इंडिगोच्या गोंधळावर प्रतिक्रिया देत त्यांनी आरोप केला की, इंडिगोचा घोळ हा केंद्राच्या मक्तेदारी मॉडेलचा परिणाम आहे कारण देशातील सर्वात मोठ्या विमान कंपनीने सलग चौथ्या दिवशी शेकडो उड्डाणे रद्द केली. विलंब, विमाने रद्द करणे आणि असहाय्यतेची किंमत सामान्य भारतीयांना चुकती करावी लागत आहे. मॅच-फिक्सिंग मक्तेदारीऐवजी भारताला प्रत्येक क्षेत्रात निष्पक्ष स्पर्धेची गरज आहे. भारत प्रत्येक क्षेत्रात निष्पक्ष स्पर्धेला पात्र आहे, मॅच फिक्सिंग मक्तेदारीला नाही.

## अभिनेता कोल्हेंचे ट्विट



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते डॉ. अमोल कोल्हे यांनाही आज इंडिगो विमानाच्या गोंधळाचा फटका बसला. पुणे विमानतळावर गर्दीत ते दिसत होते. गर्दीतून वाट काढत विमानाची काय परिस्थिती आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न ते करत होते. त्यांनी याबाबत ट्विट करीत म्हणाले की, इंडिगोकडून ही अपेक्षा नव्हती. पुन्हा इंडिगोने प्रवास करणार नाही, असे म्हटले.

# आयोग झोकांड्या खात आहे

पान १ वरून – आणि आघाड्या झाल्या. पारदर्शकता नावालाही नाही. एकावर अन्याय करायचा, दुसऱ्याला पैसे वाटायला परवानगी द्यायची असे प्रकार चालले आहेत. आयोग कोणाच्या तरी प्रचंड दबावाखाली काम करत आहे असे दिसते. ही अदृश्य शक्ती कोण आहे हे जनता जाणते. आयोगाच्या अधिकाऱ्यांना नियमानुसार निर्णय घ्यायचे अधिकार नाहीत. हे सांगतील तसे निर्णय अधिकारी घेतात. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणूक आयोगाच्या गलथानपणाबद्दल नापसंती व्यक्त केली होती. त्या संदर्भात, आयोगाचे काम आपल्याला आवडलेले नाही, असे सत्ताधारीच म्हणत असतील तर मग हा आयोग नेमला तरी कोणी, कोणी या अधिकाऱ्यांची नेमणूक केली, असा सवाल जानकर यांनी केला.

# मतमोजणी २१ डिसेंबरलाच

पान १ वरून – दृष्टीने याचिकांवर लवकरात लवकर अंतिम निर्णय घ्या. सर्व निवडणुका या ३१ जानेवारीपूर्वी झाल्याच पाहिजेत. न्यायालयाच्या या स्पष्ट आदेशामुळे आता जिल्हा परिषद आणि महापालिका निवडणुका लवकरच जाहीर कराव्या लागतील. राज्य निवडणूक आयोगाला न्यायालयाने पुन्हा एकदा सांगितले की, कोणत्याही परिस्थितीत आम्ही आखून दिलेल्या वेळापत्रकानुसार कालमर्यादितच निवडणुका पार पडतील, असे नियोजन करा. कोणत्याही परिस्थितीत सर्व निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पूर्वीच झाल्या पाहिजेत.

# शिक्षकांचे राज्यभर आंदोलन

पान १ वरून

याचिका दाखल करून शिक्षकांची बाजू न्यायालयात मांडावी, अशी शिक्षकांची मागणी आहे. यासह जुनी पेन्शन योजना त्वरित लागू करणे आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया सुरू करणे यांचाही मागण्यांत समावेश आहे. यासाठी करण्यात आलेल्या आंदोलनात शिक्षकांसह शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग होता. शिक्षकांनी इशारा दिला की, मागण्या मान्य झाल्यास आंदोलन अधिक तीव्र केले जाईल. सरकारने एक दिवसाचा पगार कापण्याचा इशारा दिला आहे. पण एक दिवसाचा नव्हे तर महिनाभराचा पगार कापला तरी मागे हटणार नाही.

माजी शिक्षक आमदार कपिल पाटील यांनी मुंबईतील शिक्षण उपसंचालक कार्यालयाला भेट देऊन टीईटी सक्ती रद्द करण्याची मागणी केली. ते म्हणाले की, राज्यातील २५ हजार शाळांतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि संस्थाचालक आज संपावर आहेत. टीईटीचा निर्णय जो सुप्रीम कोर्टाने घेतला आहे, त्याला राज्य सरकार आणि केंद्र सरकार दोघेही जबाबदार आहेत. पूर्वलक्ष्यी प्रभावाने जर हा निर्णय राबवला तर देशातले लक्षावधी शिक्षक हे घरी जातील. त्यांच्या नोकऱ्या जातील. पेन्शन जाईल.

SBI-SG
One Stop Solution For All Investments
**SBI-SG GLOBAL SECURITES SERVICES PVT LTD,**
B Wing, Ground Floor, Jeevan Seva Annex (LIC) building, SVP Road, Santacruz – W, Mumbai – 400054, Maharashtra, India

**TENDER NOTICE**

Chief Administrator & Financial officer, SBI-SG Global Securities Services Pvt Ltd, B Wing, Ground Floor, Jeevan Seva Annex (LIC) building, SVP Road, Santacruz – W, Mumbai – 400054, Maharashtra, India invites sealed bids from eligible bidders (Eligibility, Technical Bid and Commercial Bid) from authorized OEMs (Dell, HP and Lenovo) or through their authorized distributors/partners for supply, Installation and Support of 25 Laptops (Phase I) with comprehensive 3 years warranty and accidental insurance for its Head Office employees as per requirement mentioned in RFP number SBISGGSS/IT/25-26/770 dated **06th Dec 2025**. The complete set of bidding documents along with schedule of events can be downloaded from our website **https://www.sbisgcsl.co.in/statutory/** "TENDER" section. Complete set of bidding documents may be submitted in sealed envelopes on or before **18th Dec 2025** by **11:30 pm** at our registered office.

S/d
**(Amitav Kar)**
**Chief Financial Officer**

**फॉर्म ए**
**जाहीर उद्घोषणा**
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अन्वये)

**मे. केएल एंटरप्रायझेस एलएलपी (सीआयआरपीमध्ये) च्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

| संबंधित तपशील | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | **मे. केएल एंटरप्रायझेस एलएलपी** |
| २. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेचा दिनांक | ०१.०६.२०११ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणीकरण झाले | कंपनी निबंधक, मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक/ मर्यादित दायित्व ओळख क्र. | AAA-5012 |
| ५. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | **विद्यमान नोंदणीकृत कार्यालयीन पत्ताः** ४२, १ला मजला, ८ ते १०, बारा चाळ, सिताराम जाधव मार्ग, डिलाईल रोड, लोअर परेल, मुंबई, महाराष्ट्र, भारत ४०००१३. **आधीचा नोंदणीकृत कार्यालयीन पत्ताः** ६०१ आणि ६०२, ६वा मजला, सुख सागर, एन. एस. पाटकर मार्ग, गिरगाव चौपाटी, मुंबई, महाराष्ट्र, भारत - ४००००७. |
| ६. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या संदर्भात दिवाळखोरी सुरू होण्याचा दिनांक | ०४.१२.२०२५ |
| ७. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा अंदाजित दिनांक | ०२.०६.२०२६ |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक | **प्रदीप कुमार काब्रा** IBBI/IPA-001/IP-P01104/2017-18/11790 |
| ९. | मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल | **प्रदीप कुमार काब्रा** सी/९०५, ओफिरा बिल्डींग, व्ही.आय.पी. रोड, भारठाणा, वेसू, सुरत, गुजरात ३९५००७. ईमेलः ippradeepkabra@gmail.com |
| १०. | अंतरिम ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल | **प्रदीप कुमार काब्रा** ३०१, ३रा मजला, रीगस बिझनेस सेंटर, मर्सिडिस शोरूमच्या वर, न्यू सिटी लाईट रोड, भारठाणा, वेसू, सुरत, गुजरात-३९५००७. ईमेलः ip.klenterprises@gmail.com |
| ११. | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | गुरुवार, १८.१२.२०२५ |
| १२. | अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केल्यानुसार, कलम २१ च्या उप-कलम (६अ) च्या खंड (ब) अन्वये धनकोचे वर्ग, जर असल्यास. | लागू नाही |
| १३. | वर्गामध्ये धनकोचा प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गामध्ये तीन नावे) | लागू नाही |
| १४. | (अ) संबंधित अर्ज आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील उपलब्ध असेलः | अ. वेब लिंक https://ibbi.gov.in/home/downloads (ब) लागू नाही |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण यांनी **दि. ०४ डिसेंबर, २०२५** रोजी **मे. केएल एंटरप्रायझेस एलएलपी**ची कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.

**मे. केएल एंटरप्रायझेस एलएलपी** च्या धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह गुरुवार, दि. १८ डिसेंबर, २०२५ रोजी किंवा त्यापूर्वी अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याकडे नोंद क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.

आर्थिक धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुराव्यासहीत दावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.

दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

सही/-
**सीए. आयपी प्रदीप कुमार काब्रा**
**मे. केएल एंटरप्रायझेस एलएलपी करिता आयआरपी**
दिनांकः ०६.१२.२०२५ **आयबीबीआय नोंदणी क्र.**: IBBI/IPA-001/IP-P01104/2017-18/11790

# वरळीच्या हॉटेलात भाजपा-उबाठा राडा

पान १ वरून

सेंट रेजिस हॉटेलमध्ये उबाठाची कामगार युनियन आहे. या हॉटेलमध्ये भाजपाने आपल्या कामगार संघटनेचा फलक लावला. त्याला उबाठाच्या कामगार सेनेने आक्षेप घेतला. त्यानंतर तिथे निशिकांत शिंदे यांच्या नेतृत्त्वाखाली मोठ्या प्रमाणावर शिवसैनिक जमले. त्यांनी भाजपाचा फलक फाडून टाकला आणि जोरदार घोषणाबाजी केली. पोलिसांनी त्यांना आवरण्याचा प्रयत्न केला. परंतु संतप्त शिवसैनिक त्यांना मागे ढकलत होते. त्यामुळे हॉटेल रेजिसमध्ये काही काळ गोंधळ निर्माण झाला. उबाठाच्या कामगार नेत्यांनी सांगितले की, इथे गेल्या पंधरा वर्षांपासून आमची युनियन आहे. आज त्यांनी लपूनछपून त्यांच्या युनियनचा फलक लावला. हिंमत होती, तर आमच्या समोर फलक लावायला हवा होता. आम्ही आल्यावर ते पळून गेले. ते पळपुटे आहेत. आम्ही खरे बाळासाहेबांची शिवसेना आहोत. आमची युनियन कामगारांची आहे. कुणीतरी बाहेरून येणाऱ्यांची युनियन इथे चालणार नाही. बोर्ड लावायला त्यांनी हॉटेल मॅनेजमेंटची परवानगी घेतली होती का?

भाजपाच्या नेत्यांनी सांगितले की, सेंट रेजिसमध्ये भारतीय जनता पक्षाची युनियन आमच्याकडे पूर्वीपासून होती. बलबीर नेगी या युनियनचे नेते आहेत. अलीकडे १७० कामगार आमच्याकडे आले. त्यामुळे या हॉटेलमध्ये आमच्या कामगारांची संख्या जास्त आहे. त्यामुळे आम्ही येथे बोर्ड लावला. उबाठाच्या कामगारांनी तो फाडला. ठाकरेंसोबत कामगार कार्यकर्ते का राहत नाही, याचे त्यांनी आत्मपरीक्षण करायला हवे. त्यांचा आरोपांना उत्तर म्हणू आम्ही अशी कुठलीही फोडाफोडी करत नाहीत. पण आता आम्ही शांत बसणार नाही. दरम्यान वरळीतील राड्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपाच्या कामगार नेत्यांना भेटीसाठी वर्षा या आपल्या निवासस्थानी बोलावले. राडा करणाऱ्यांवर कारवाई करण्याचा इशारा देत फडणवीस म्हणाले की, कामगार युनियनमध्ये त्यांच्या त्यांच्या मनाप्रमाणे काम करण्याचा अधिकार दिलेला असतो. संविधानानुसार सगळ्यांना मनाप्रमाणे काम करू द्यायला हवे.

# भारताला तेलाचा अखंडित पुरवठा करू

पान १ वरून

झाली. त्यानंतर दोन्ही नेत्यांनी संयुक्त पत्रकार परिषदेला संबोधित केले. पुतिन म्हणाले की, उत्कृष्ट स्वागताबद्दल धन्यवाद. आमची चर्चा सकारात्मक आणि मैत्रीपूर्ण वातावरणात झाली. रशिया हा तेल, वायू, कोळसा आणि ऊर्जेच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टींचा भारताचा पुरवठादार आहे. मॉस्को नवी दिल्लीच्या इंधन गरजांना कोणत्याही व्यत्ययाशिवाय पाठिंबा देण्यास तयार आहे. वेगाने वाढणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेसाठी आम्ही इंधनाची अखंड निर्यात सुरू ठेवण्यास तयार आहोत. सर्वात मोठा भारतीय अणुऊर्जा प्रकल्प बांधण्याच्या प्रकल्पावरही आम्ही काम करत आहोत. सहापैकी तीन अणुभट्ट्या आधीच ऊर्जा नेटवर्कशी जोडल्या गेल्या आहेत. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर भारताच्या भविष्यातील स्वच्छ ऊर्जा पायाभूत सुविधांचा आधारस्तंभ आणि भारत-रशियन तांत्रिक सहकार्याचे प्रमुख प्रतीक बनणार आहे.

भारत-रशिया द्विपक्षीय व्यापार गेल्या वर्षी १२ टक्क्यांनी वाढून सुमारे ६४ अब्ज डॉलर्सवर पोहोचला आहे, ज्यामुळे एक नवीन विक्रम प्रस्थापित झाला आहे. यावर्षीचा व्यापार समान पातळीवर राहण्याची अपेक्षा आहे आणि तो १०० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवण्याचा विश्वास पुतिन यांनी व्यक्त केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही आव्हानांकडे काळजीपूर्वक लक्ष देण्याची गरजही पुतिन यांनी व्यक्त केली. भारत आणि रशिया हळूहळू पेमेंट सेटलमेंटसाठी त्यांच्या राष्ट्रीय चलनांचा वापर करण्याकडे वाटचाल करत आहेत. तसेच ९६ टक्के व्यावसायिक पेमेंट अशा प्रकारे आधीच गेले आहे. व्यापारी चलनावर हळूहळू सहमती होत आहे.

भारत आणि रशियामधील दीर्घकालीन संरक्षण संबंधांचेही पुतिन यांनी कौतुक केले आणि भारतीय सशस्त्र दलांच्या आधुनिकीकरणात रशियाची भूमिका स्पष्ट केली. रशिया गेल्या अर्ध्या शतकापासून भारतीय सैन्याला, ज्यामध्ये हवाई संरक्षण दल, विमान वाहतूक आणि नौदलाचा समावेश आहे, शस्त्रास्त्रे आणि आधुनिकीकरण करण्यासाठी मदत करत आहे. नुकत्याच झालेल्या वाटाघाटींवर आम्ही निःसंशय समाधानी आहोत. आज झालेले करार भारत आणि रशियाच्या लोकांच्या फायद्यासाठी आहेत. त्यामुळे रशियन-भारतीय धोरणात्मक भागीदारी आणखी दृढ करण्यास मदत होईल.

**भारत -रशियाची मैत्री ध्रुव ताऱ्यासारखी**


पुतिन यांच्या आधी प्रसिद्धी माध्यमांसमोर बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, माझे मित्र राष्ट्रपती पुतिन आणि दोन्ही देशांचे प्रतिनिधी यांचे २३ व्या भारत-रशिया द्विपक्षीय शिखर परिषदेसाठी स्वागत करताना मला आनंद होत आहे. पंचवीस वर्षांपूर्वी राष्ट्रपती पुतिन यांनी आमच्या धोरणात्मक भागीदारीचा पाया रचला. गेल्या आठ दशकांत जगाने अनेक चढ-उतार पाहिले आहेत. तथापि, भारत आणि रशियामधील मैत्री ध्रुव ताऱ्यासारखी अढळ राहिली आहे. हे नाते परस्पर आदर आणि विश्वासावर बांधले गेले आहे. आज आम्ही या नात्याला बळकट करण्यास मदत करणाऱ्या सर्व घटकांवर चर्चा केली आहे.

मला आनंद वाटतो की, आम्ही लवकरच रशियन नागरिकांसाठी मोफत ३० दिवसांचा ई-टूरिस्ट व्हिसा व ३० दिवसांचा ग्रुप टुरिस्ट व्हिसा सुरू करणार आहोत. ऊर्जा सुरक्षा ही आमच्या भागीदारीचा एक मजबूत आधारस्तंभ आहे आणि आम्ही हे सहकार्य सुरू ठेवू. भारताने नेहमीच युक्रेनमध्ये शांततेचा पुरस्कार केला आहे. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी केलेल्या सर्व प्रयत्नांचे आम्ही स्वागत करतो. भारत नेहमीच योगदान देण्यास तयार आहे. दहशतवादाविरुद्धच्या लढाईत भारत व रशियाने नेहमीच खांद्याला खांदा लावून सहकार्य केले आहे.

# नवा काळ

• पुणे । शनिवार ६ डिसेंबर, २०२५ • पान -८


## अमिताभ बच्चन यांचे नाव झाशीच्या मतदार यादीत!



**लखनौ** - मतदार याद्यांच्या विशेष सखोल फेरनिरीक्षणादरम्यान (एसआयआर) एक आश्चर्यजनक माहिती समोर आली आहे. गेली कित्येक वर्षे मुंबईत वास्तव्यास असलेले बॉलिवूडचे महानायक अमिताभ बच्चन यांचे नाव उत्तर प्रदेशमधील झाशी या ऐतिहासिक शहरातील मतदार यादीमध्ये आढळून आले आहे.अमिताभ यांच्यासोबत त्यांचे दिवंगत वडील सुप्रसिध्द कवी हरिवंशराय बच्चन यांचेदेखील नाव मतदार यादीत आहे. झाशीतील ओरछा गेटच्या बाहेर असलेल्या काचियाना परिसरात घर क्र.५४ मध्ये बच्चन पिता-पुत्राचे नाव आहे. यादीत बच्चन यांचे वय ७६ वर्षे दाखवण्यात आले आहे आणि वरताण म्हणजे या ठिकाणी अमिताभ बच्चन यांनी २००३ साली मतदानही केले असे या अधिकृत कागदपत्रात नोंद आहे. यासंदर्भात माध्यमांच्या प्रतिनिधींनी परिसरात चौकशी केली असता आम्ही अमिताभ बच्चन यांना फक्त पडद्यावर पाहिले आहे. ते आमच्या शेजारी राहतात किंवा कधी काळी रहात होते याची आम्हाला कल्पना नाही. आम्ही त्यांना कधीच येथे पाहिले नाही.

## मुंबई-गोवा महामार्ग

### पुन्हा तारीख पे तारीख

**कोणी** विषय गांभीर्यानं घेत नाही. प्रत्येकजण सोयीनुसार हा विषय वापरतोय. कोणी या विषयाचं राजकारण करतंय, कोणी विषयाची टिंगल-टवाळी करतंय, तर कोणी उपेक्षा. व्यक्तीपरत्वे या प्रतिक्रिया येतात.

मागे एकदा अजित पवार यांनी मुंबई - गोवा या विषयावर कोणी तरी पुस्तक लिहावं असा मोलिक सल्ला दिला होता. कोणी पिक्चर काढण्याची, कोणी सर्वाधिक काळ रखडलेला रस्ता म्हणून गिनीज बुकात याची नोंद करण्याची सूचना केलेली आहे. तात्पर्य रस्ता झाला काय? नाही झाला काय. कोणालाच काही पडलेलं नाही.

२००५ मध्ये पहिल्यांदा वडखळ नाका येथे चौपदरीकरणासाठी पत्रकारांनी आंदोलन केलं २० वर्षे झाले त्याला. नंतरही वेळोवेळी पत्रकार रस्त्यावर उतरत राहिले, आपल्या लेखण्या झिजवत राहिले. हाती काय पडलं? तारीख पे तारीख..

आता पत्रकारही थकलेत. किती वेळा तेच ते बोलायचं,अन लिहायचं? होत काहीच नाही. गणपती आले की, राज्याचे बांधकाम मंत्री रस्त्याची पाहणी करतात, निवडणुका आल्या की, पुढारी आश्वासनं देतात. हा नेहमीचा शिरस्ता.

या महामार्गाच्या संदर्भात आजही माझ्याकडं दोन बातम्या आहेत. पहिली बातमी आहे. खासदार सुनील तटकरे यांनी घेतलेल्या मुंबई - गोवा महामार्गासंदर्भातल्या आढावा बैठकीची..जिल्हा परिषदेच्या निवडणुका आहेत, काही दाखवावं तर लागेलच की.? त्यासाठी खासदार महोदयांनी अधिकाऱ्यांना सुतारवाडीत बोलावलं. प्रकल्प वेळेत पूर्ण करा अशी तंबी दिली. त्यांच्या एक्स वर त्यांनीच ही माहिती दिली आहे.. वेळेत पूर्ण करा म्हणजे नेमका केव्हा पूर्ण करावा हे मात्र त्यांनी गुलदस्त्यात ठेवलं.. ते तसं कोणीच सांगत नाही, हेच खरं दुखणं आहे. दुसरी बातमी लोकसभेतील.

विनायक राऊत यांच्या प्रश्नावर उत्तरं देताना नितीन गडकरी यांनी आज हा रस्ता एप्रिल २०२६ मध्ये पूर्ण होईल असं सांगितलं. विलंबाची तीच ती कारणं त्यांनी न विसरता सांगितली. म्हणजे कोर्ट कचेरया, भूसंपादनाचे खटले, ठेकेदार बदलणे आदि. तरीही ८९ टक्के काम पूर्ण झाल्याचं त्यांनी म्हटलंय. जाता जाता त्यांनी खापर मागच्या सरकारवर म्हणजे काँग्रेसवर फोडलं. काम २००९ मध्ये सुरू झालं. आम्ही २०१४ मध्ये सत्तेवर आलो.. वगैरे वगैरे.

मात्र हे सांगताना ते हे विसरले की, काँग्रेसमुळे काम जर पाच वर्षे रखडले असेल तर भाजपमुळे ११ वर्षे रखडलंय. त्याचं काय? अर्थात हे झालं तुमचं राजकारण. यात कोकणी जनतेची काय चूक?

**खरं तर मुंबई - गोवा महामार्गाबद्दल लिहावं असं काही आता शिल्लक नाही.. लिहिलं तरी कोणाला त्याची लाज - शरम वाटत नाही.**



सरकारला हवे असणारे प्रकल्प विक्रमी वेळेत पूर्ण होतात. समृध्दी महामार्गाचं बघा. कोणताही अडथळा न येता काम झालं.. इथं भूसंपादनाचे वाद का नाही झाले? शक्तीपीठ महामार्गाला जनतेचा विरोध असताना तो रस्ता रेटून नेला जातोय..

अन कोकणची लाइफ लाइन असलेला मुबई - गोवा महामार्ग १६ वर्षे रखडतोय?

काय म्हणायचं याला.? अन का होतंय हे? सर्वपक्षीय नेते याला जबाबदार आहेत. स्थानिक नेत्यांनी जाणीवपूर्वक या रस्त्याकडे दुर्लक्ष केलेलं आहे. माझ्यामते तेच जास्त जबाबदार आहेत. आपल्या विभागाचा विकास झाला पाहिजे असं त्यांना का वाटत नाही? हा कळीचा सवाल आहे.

स्थानिक नेत्यांच्या या उदासिनतोमुळे कोकणच्या रस्त्यावर दररोज रक्ताचे सडे पडतात. माझ्यासाठी हा विषय जिव्हाळ्याचा यासाठी आहे की, हा रस्ता व्हावा यासाठी जी आंदोलनं झाली त्यात माझा पुढाकार आणि सक्रीय सहभाग होता. गेली २० वर्षे हा रस्ता माझ्या डोक्यात आहे. आजही माझा पाठपुरावा सुरू आहे. आमचं दुर्दैव असं की, कोकणातील पत्रकार हा विषय घेऊन २० वर्षे लढा देताहेत आणि त्याची दखल घ्यावी असं व्यवस्थेला वाटत नाही.

निषेधार्ह आहे हे सारं.

**एस.एम.देशमुख**

## उठाबशा काढण्याच्या शिक्षेमुळे मुलीचा मृत्यू! ३ अधिकारी निलंबित

■ वसई

**वसईतील** एका शाळेत उठाबशा काढण्याची शिक्षा दिल्यामुळे १३ वर्षीय मुलीचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी चौकशी समितीच्या अहवालानंतर शिक्षण विभागातील ३ अधिकार्यांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. त्यात गटशिक्षण अधिकारी, पंचायत समिती विस्तार अधिकारी आणि केंद्र प्रमुखांचा समावेश आहे.

वसईच्या सातिवली येथील श्री हनुमंत विद्या मंदिर या शाळेतील एका शिक्षिकेने १४ नोव्हेंबर रोजी शाळेत उशिरा येणाऱ्या विद्यार्थ्यांना उठाबशा काढण्याची शिक्षा दिली होती. या शिक्षेमुळे ६ वीत शिकणाऱ्या १३ वर्षीय विद्यार्थीनीची प्रकृती खालावली होती. नंतर तिचा उपचारादरम्यान मृत्यू झाला होता. या प्रकरणी वालीव पोलिसांनी शिक्षिकेविरोधात गुन्हा दाखल करून तिला अटक केली होती. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी जिल्हा परिषेदच्या शिक्षण विभागाने चौकशी समिती स्थापन केली होती. समितीने दिलेल्या अहवालानंतर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी तीन अधिकाऱ्यांना निलंबित केले आहे.

## मविआचे शेतकऱ्यांसाठी संसद परिसरात आंदोलन

■ नवी दिल्ली

**संसदेच्या** हिवाळी अधिवेशनाचा आज पाचवा दिवस होता. सभागृहाचे कामकाज सुरू होण्याआधी महाविकास आघाडीच्या खासदारांनी संसदेच्या मकर दारावर शेतकऱ्यांना मदत करण्याच्या मागणीसाठी निदर्शन केले. राज्यातील अतिवृष्टी आणि हवामानातील अनियमिततेमुळे मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान झाले असून, त्यामुळे सरकारने त्वरित उपाययोजना करण्याची मागणी खासदारांनी केली. निदर्शनात विशाल पाटील, प्रणिती शिंदे, संजय देशमुख, बळवंत वानखेडे आणि इतर महाविकास आघाडीचे खासदार सहभागी झाले होते. त्यांनी शेतकऱ्यांना खोटे आश्वासन देणाऱ्या सरकारच्या धोरणांचा तीव्र विरोध नोंदवला.

## अंबा घाटात बस कोसळली नेपाळी मजूर जखमी

■ रत्नागिरी

**अंबा** घाटात आज पहाटे ५ वाजताच्या सुमारास भीषण अपघात झाला. मध्यप्रदेशची खासगी बस तब्बल ७० फूट दरीत कोसळली. या अपघातात १५ जण जखमी झाले. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. बसमध्ये असलेले सर्व प्रवासी नेपाळवरून आलेले मजूर होते आणि ते रत्नागिरीतील आंबा बागेत काम करण्यासाठी जात होते. चक्री वळणाजवळ बस दरीत कोसळली. दरीत कोसळताना बस एका मोठ्या झाडाला आदळल्याने ती पूर्ण खोल दरीत जाण्यापासून थांबली आणि त्यामुळे मोठी जीवितहानी टळल्याचे स्थानिकांनी सांगितले.

## फिनफ्लूएन्सर अवधूत साठेंना दणका सेबी ५४६ कोटी रुपये जप्त करणार

■ मुंबई

**प्रसिद्ध** फायनान्स इफ्लूएन्सर अवधूत साठे आणि त्यांच्या अकादमीने गुंतवणूकदारांना खोटी माहिती देत ५४६ कोटी रुपयांहून अधिक अवैध नफा मिळवल्याचा आरोप ठेवून सेबीने ही रक्कम त्यांच्याकडून जप्त करण्याचे आदेश दिले आहेत. याशिवाय त्यांच्यावर अनेक निर्बंध लादले आहेत.

सेबीने अवधूत साठे यांना पुढील आदेशापर्यंत सिक्युरिटीज मार्केटमध्ये व्यवहार करण्यापासून आणि आपल्या कोर्समध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांच्या कामगिरीची जाहिरात करण्यास मनाई करण्यात आली आहे. अवधूत साठे यांना सध्याच्या कोर्समध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांकडून कोणतीही फी गोळा न करण्याचे आणि त्यांच्या ॲकॅडमीशी संबंधित सर्व वेबसाइट आणि जाहिराती काढून टाकण्याचे निर्देश देण्यात




आले आहेत. साठे यांच्या अकादमीचे मुख्यालय मुंबईत असून तिची दिल्ली, चंदीगड, कोलकाता, भुवनेश्वर, बेंगळुरू, चेन्नई आणि हैदराबादसह इतर शहरांमध्येही केंद्र आहेत.

## विरारमधील इमारत दुर्घटना प्रकरणी सहाय्यक आयुक्त घोन्साल्विसना अटक

■ वसई

**विरारमधील** रमाबाई अपार्टमेंट दुर्घटनेप्रकरणी वसई विरार महापालिकेचे सहाय्यक आयुक्त गिल्सन घोन्साल्विस यांना गुन्हे शाखा ३ च्या पथकाने काल मध्यरात्री अटक केली आहे. इमारत अनधिकृत असूनही कारवाई न करणे तसेच इमारत धोकादायक असताना ती रिकामी न केल्याचा ठपका घोन्साल्विस यांच्यावर ठेवण्यात आला आहे.

२६ ऑगस्ट रोजी विरार पूर्वेला असलेली रमाबाई अपार्टमेट ही चार मजली इमारती कोसळली होती. या दुर्घटनेत १७ जणांचा मृत्यू झाला होता, तर ९ जण जखमी झाले होते. ही इमारत अनधिकृत आणि धोकादायक होती. या प्रकरणी विरार पोलिसांनी बिल्डर आणि जमीन मालकाविरोधात विविध कलमांखाली गुन्हा दाखल करून बिल्डर नितल साने याला अटक करण्यात आली होती. नंतर या प्रकरणाचा तपास गुन्हे शाखा ३ कडे सोपविण्यात आला होता.

२०१८ मध्ये इमारतीचे संचरत्नामक लेखापरिक्षण (स्ट्रक्टरल ऑडीट) केल्यावर इमारत अनधिकृत असल्याचे आढळली होती. मात्र तत्कालीन सहाय्यक आयुक्त सुभाष जाधव यांनी संबंधित बिल्डर सानेविरोधात गुन्हा दाखल न करता केवळ नोटीस बजावली होती.

## अमरावती-मुंबई विमानसेवा १५ डिसेंबरपर्यंत बंद राहणार

■ अमरावती

**अमरावतीहून** मुंबईला जाणारी विमानसेवा १५ डिसेंबर पर्यंत तात्पुरती बंद ठेवण्याचा निर्णय प्राधिकरणाकडून घेण्यात आला आहे. ही बंदी दाट धुक्यामुळे उड्डाणावर परिणाम होत असल्याने लागू करण्यात आली आहे. प्रवाशांना या निर्णयाबाबत अधिकृतरित्या कळविण्यात आले आहे.

१५ डिसेंबरनंतर विमानसेवा पूर्ववत सुरू होणार की नाही याबाबत अद्याप अनिश्चितता कायम असून परिस्थिती हवामानाच्या स्थितीवर अवलंबून राहणार आहे. विमानसेवा १५ दिवसांपेक्षा जास्त काळ ठप्प राहण्याची शक्यता व्यक्त केली जात असल्याने प्रवाशांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त लाखो अनुयायी मुंबईत दाखल

■ मुंबई

**भारतरत्न** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त देशभरातून लाखो अनुयायी मुंबईत दाखल झाले आहेत. चैत्यभूमी, छत्रपती शिवाजी महाराज मैदान आणि राजगृह या प्रमुख स्थळांवर डॉ. आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी येत असल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिका पूर्णपणे सज्ज झाली आहे. शिवाजी पार्क येथे १ लाख चौरस फूट क्षेत्रफळावर वॉटरप्रूफ निवासी मंडप उभारण्यात आला असून एलईडी स्क्रीन, नियंत्रण कक्ष, सीसीटीव्ही आणि सुरक्षा उपकरणांसह अग्निशमन दल, रुग्णवाहिका आणि बोट यांची व्यवस्था करण्यात आली आहे.

अनुयायांच्या सोयीसाठी मध्य रेल्वेने १२ विशेष लोकल फेऱ्या चालवण्याची घोषणा केली आहे. या गाड्या परळ-कल्याण आणि कुर्ला-पनवेल दरम्यान शुक्रवार ते शनिवारी मध्यरात्रीपर्यंत धावतील.

उद्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबई आणि ठाण्यासह अनेक शाळा तसेच सरकारी व निमसरकारी कार्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. सामाजिक न्याय आणि मानवी हक्कांसाठी डॉ. आंबेडकर यांनी केलेल्या कार्याचा सन्मान म्हणून हा निर्णय घेण्यात आल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे.

## रवींद्र चव्हाणांबद्दल मनात आदर निलेश राणेंकडून वादावर पडदा

■ सिंधुदुर्ग

**माझ्या** मनात भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याबद्दल खूप आदर आहे आणि तो पुढेही कायम राहणार आहे, असे सांगत शिवसेनेचे आमदार निलेश राणे यांनी शिवसेना-भाजप मतभेदावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला.


राणे म्हणाले की, माझ्यात आणि रवींद्र चव्हाण यांच्यामध्ये नेमका कसला वाद होता? मी स्वबळावर निवडणूक लढवली. माझी इच्छा होती की युती व्हावी, पण ती झाली नाही. मी पाठपुरावा करून काही गोष्टी जनतेसमोर ठेवल्या एवढाच प्रकार होता. आता मी रवींद्र चव्हाण आणि फडणवीस यांना भेटणार आहे. हे मी निवडणुकीच्या वेळीही स्पष्ट सांगितले होते. भाजपा हेदेखील माझे कुटुंब आहे, त्यापासून मी फारकत घेऊ शकत नाही. हा आमच्या कुटुंबाचा विषय आहे. आम्हीच तो सोडवून घेऊ. निलेश राणे पुढे म्हणाले की, मी तक्रारी मागे घेणार नाही. कारण मी ज्यांच्यासाठी तक्रार केली आहे. त्यांच्यावर अन्याय होईल. भाजपामधून कुणीही मला तक्रार मागे घ्या, असे सांगितलेले नाही. मी जे केले त्यातून माघार घेण्याचा प्रश्नच नाही.

## अरुंधती रॉय यांच्या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर आक्षेप

■ तिरुअनंतपुरम

**प्रसिध्द** लेखिका अरुंधती रॉय यांच्या 'मदर मेरी कम्स टू मी' या पुस्तकाच्या मुखपृष्ठावरील छायाचित्रावर आक्षेप घेणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. त्याचबरोबर अशाप्रकरची निरर्थक याचिका केल्याबद्दल याचिकाकर्त्याला चांगलेच फटकारले.

ॲड. राजसिंहन यांनी ही याचिका सर्वप्रथम केरळ उच्च न्यायालयात दाखल केली होती. मात्र उच्च न्यायालयाने त्यांची याचिका फेटाळल्यानंतर त्यांनी सर्वोच्च न्यायालयात




आव्हान दिले होते. रॉय यांच्या मदर मेरी कम्स टू मी या कादंबरीच्या मुखपृष्ठावर त्यांचे धूम्रपान करतानाचे छायाचित्र छापले आहे. या छायाचित्रावर राजसिंहन यांनी आक्षेप घेतला होता. या छायाचित्रातून अरुंधती धूम्रपानास प्रोत्साहन देत आहेत.

### याचिका फेटाळली

तसेच धुम्रपानासंबंधीच्या कायद्याचेही त्यांनी उल्लंघन केले आहे, असा दावा करत राजसिंहन यांनी कादंबरीच्या वितरण आणि विक्रीवर बंदी घालण्याची मागणी केली होती. सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. ज्यॉयमल्या बागची यांच्या खंडपीठासमोर याचिकेवर सुनावणी झाली. त्याप्रसंगी न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की, अरुंधती रॉय या प्रतिष्ठित लेखिका आहेत. त्यांनी आपल्या लेखनातून धुम्रपानाचे उदात्तीकरण केलेले नाही. कादंबरीच्या छायाचित्राची शहरात कुठेही होर्डिंग लावून जाहिरात करण्यात आलेली नाही. त्यांनी तंबाखूजन्य वस्तुंच्या संदर्भातील कायद्याचे उल्लंघन केलेले नाही.

## शौर्य पाटील आत्महत्याप्रकरणी दिल्ली पोलिसांना कोर्टाची नोटीस

■ नवी दिल्ली

**शौर्य** पाटील आत्महत्याप्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयाने दिल्ली पोलिसांना नोटीस पाठवून या प्रकरणाचा सद्यस्थिती अहवाल सादर करण्यास सांगितले आहे.

मूळचा महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील असलेला शौर्य पाटील हा सोळा वर्षे वयाचा विद्यार्थी दिल्लीतील सेंट कोलंबस शाळेत शिकत होता. शाळेतील काही शिक्षक आणि मुख्याध्यापकांकडून होणाऱ्या छळाला कंटाळून त्याने आत्महत्या केली. मृत्यूपूर्वी त्याने लिहिलेल्या चिठ्ठीत तसा उल्लेख आहे. शौर्यने आरोप केलेल्या शिक्षकांविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली. मात्र त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात आलेली नाही. त्यावरून शौर्यचे वडील प्रदीप पाटील यांनी दिल्ली उच्च न्यायालयात दाद मागितली आहे. या याचिकेवर नुकतीच सुनावणी झाली. त्याप्रसंगी न्यायालयाने दिल्ली पोलिसांना नोटीस बजावली. या प्रकरणी पुढील सुनावणी १२ डिसेंबर रोजी होणार आहे.

## ओंकार हत्तीला अंबानींच्या वनतारामध्ये हलवणार?

**महाराष्ट्र आणि गोव्याच्या सीमाभागात गेले सुमारे चार महिने धुमाकूळ घालत असलेल्या ओंकार या जंगली हत्तीला पकडून उद्योगपती मुकेश अंबानी यांचे पुत्र अनंत अंबानी यांच्या गुजरातमधील वनतारा वन्य प्राणी पुनर्वसन केंद्रात हलविण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. गोव्याच्या वनखात्याची यासंदर्भात महाराष्ट्राच्या वनखात्याशी चर्चा सुरू आहे.**

■ पणजी

**दहा** वर्षे वय असलेला ओंकार हत्ती सुमारे तीन महिने महाराष्ट्रातील सीमेलगतच्या गावांत धुमाकूळ घातल्यानंतर ३० नोव्हेंबर रोजी



पुन्हा गोव्यात दाखल झाला आहे. पेडणे येथील फकीरपाडो येथे तो पहिल्यांदा दृष्टीस पडला. दुसऱ्या दिवशी तो तोरसेमध्ये आढळून आला. तोरसेमध्ये त्याने शेती आणि बागायतींची मोठी नासधूस केली. सध्या त्याचा संचार मोपा-उगवे-निगाल्ये-पोरास्काडा पट्ट्यात आहे.येथे त्यांनी केळीच्या बागांचे प्रचंड नुकसान केले आहे. काही वाहनांचीदेखील त्याने तोडफोड केली आहे. वन विभागाने ओंकारला पकडण्यासाठी मोठी मोहीम हाती घेतली आहे.

## पोलिसांनी मुस्कटदाबी केली तरी सभा होणारच! धारावी आंदोलकांचा निर्धार

■ मुंबई

**धारावी** बचाव आंदोलनाने रविवार ७ डिसेंबर रोजी कामराज हायस्कूल शेजारी, ९० फूट रोड, धारावी येथे सायंकाळी ६ वाजता जाहीर सभेचे आयोजन केले आहे. या जाहीर सभेचा प्रचार आंदोलनाचे कार्यकर्ते करत आहेत आणि जनतेमधून त्याला पप्रतिसाद मिळत आहे. मात्र आज पोलिसांनी आणि पालिकेने एकत्र येऊन सभेचे बॅनर काढून टाकले. त्यामुळे तेथील रहिवाशी संतप्त झाले.

या सभेच्या प्रचारासाठी धारावी बचाव आंदोलन व भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने धारावीत नाक्या नाक्यावर बॅनर लावण्यात आले होते. आज जे कार्यकर्ते पत्रक वाटायला जात होते त्यांना पोलिसांनी अडवले. त्यांच्याकडून पत्रके हिसकावून घेतली. त्यांना तुरुंगात टाकण्याची धमकी दिली आणि शिवीगाळ केली. संघटनेच्या कार्यकर्त्यांनी म्हटले आहे की, पोलिसांकडून ही मुस्कटदाबी चालू आहे ती अदानीच्या व भारतीय जनता पक्षाच्या इशाऱ्यावर चाललेली आहे. कितीही मुस्कटदाबी केली तरी सभा होणारच आहे. अदानीच्या दादागिरीला आम्ही भीक घालणार नाही. धारावीकराना उध्वस्त करणारा अदानीच्या एकतर्फी फायद्याचा प्रकल्प आम्ही होऊ देणार नाही. धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी अद्याप ४ ठिकाणी झोपडीधारकांच्या पात्रता याद्या म्हणजे परिशिष्ट-२ जाहीर झाले आहेत. मेघवाडी-गणेश नगर, सरदार वल्लभभाई पटेल नगर, टिळक नगर आणि राजीव गांधी नगर या त्या वस्त्या आहेत.